सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

www.dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर गुरूवार, ०९ मे २०२४ वर्ष दुसरे अंक ४८ पाने : ८ किंमत रु. ६/-








MGM UNIVERSITY
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

JOIN A RESEARCH-DRIVEN UNIVERSITY
MGMU-CET 2024
16th, 17th & 18th May 2024
Admission Entrance Test
Apply Online
Visit us : www.mgmu.ac.in
Call: 9067612000, 0240-6481111


# ठाकरे हे नकली हिंदुत्ववादी, त्यांना पैशाची भूक

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आरोप

छत्रपती संभाजीनगर : ठाकरे हे नकली हिंदुत्ववादी आहेत. त्यांना पैशाची भूक आहे. लेना बँक आहे, देना बँक त्यांना माहिती नाही. शिवसैनिकांना नोकर समजत होते. आता जो काम करील तो मोठा होईल. 'राजा का बेटा राजा नहीं, तो जो काम करेगा व राजा बनेगा'. आयत्या पिठावर रेघोट्यादेखील मारता येत नाहीत, असे प्रतिपादन करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव व आदित्य ठाकरे यांना टोला लगावला आहे.

'मातोश्री'वर आम्हाला पैसे पाठवावे लागत होते हे खरे आहे. शिवसैनिकांनी सदस्य शुल्कापोटी दिलेले ५० कोटीदेखील यांनी (उद्धवसेना) स्वाहा केले,



असा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुतीचे उमेदवार संदीपान भुमरे यांच्या प्रचारार्थ बजाजनगर, वाळूज येथील जाहीर सभेत केला. आम्हाला शिवसैनिकांची आत्मा असलेली शिवसेना ही संघटना वाचवायची होती म्हणून बंड केले. शिवसेनाप्रमुखांचे विचार हीच आमची संपत्ती असल्याचे सांगून शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांचा समाचार घेत खैरेंना मत म्हणजे खासदार इम्तियाज जलील यांना मत असल्याची टीका त्यांनी केली.

ठाकरे यांच्या उपचारावेळी आम्ही काही केले नाही. ज्या दिवशी शिवसैनिकांवर आरोप केले, त्याच दिवशी दावणीला बांधलेली शिवसेना सोडविण्यासाठी सत्तेला लाथ मारली. त्यांना उपमुख्यमंत्री फडणवीसांसह चार ते पाच भाजपाच्या नेत्यांचे व माझे राजकारण संपवायाचे होते. त्याआधी मीच त्यांचा टांगा पलटी केला.

यावेळी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड, गृहनिर्माणमंत्री अतुल सावे, आ. संजय शिरसाट यांची भाषणे झाली. पणनमंत्री अब्दुल सत्तार, शिरीष बोराळकर आदींची यावेळी उपस्थिती होती. राजेंद्र जंजाळ यांनी सूत्रसंचालन केले.

## तेजीला लागला 'ब्रेक', गुंतवणूकदारांमध्ये नाराजी

मुंबई : देशातील सर्वात जुन्या आणि भरवशाच्या व्यावसायिक घराण्यांपैकी एक टाटा समूहातील एअर कंडिशनर उत्पादक कंपनी, व्होल्टासने नुकतेच जानेवारी ते मार्च २०२३ या तिमाहीचे निकाल जाहीर केले. मंगळवारी बाजार बंद झाल्यावर कंपनीने तिमाही निकालांची घोषणा केली ज्यात कंपनीचा निव्वळ नफा एकूण १९ टाक्यांनी कमी झाला मात्र महसूल वाढ नोंदवण्यात आली. दरम्यान, घटत्या नफ्याच्या बातमीचा व्होल्टास लिमिटेडच्या स्टॉकवरही परिणाम दिसून आला आणि बाजार उघडताच शेअर ७ टक्क्यांहून अधिक आपटले.

## अक्षय्य तृतीयेपूर्वी सोनं महागलं! चांदीच्या दरातही मोठी वाढ


मुंबई : साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त म्हणजे अक्षय्य तृतीयेचा मुहूर्त असतो. यादिवशी सोनं खरेदीला विशेष महत्त्व असतं. पण अक्षय्य तृतीयेच्या आधीच सोनं आणि चांदी महागलं आहे. अक्षय्य तृतीयेपूर्वीच सोने-चांदीच्या दरात जळगावच्या सुवर्ण नगरीत पुन्हा वाढ झाली आहे. त्यामुळे अक्षय्य तृतीयेला सोनं आणि चांदीची खरेदी करण्याच्या विचारात असलेल्या ग्राहकांना मोठा फटका बसला आहे. काही दिवसांपासून किरकोळ चढउतार होत असलेल्या चांदीच्या भावात प्रतिकिलो ११०० रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे आता चांदीचा दर प्रतिकिलो ८२ हजार ७०० रुपयांवर पोहोचला आहे. तर सोन्याच्या दरात ३५० रुपयांची वाढ झाली आहे. यामुळे सोनं आता प्रतितोळा ७२ हजार ३०० रुपयांवर पोहोचलं आहे.



## लोकसभेसाठी मतदान सुरू असताना विधान परिषदेच्या निवडणुकीची घोषणा; शिक्षक, पदवीधरसाठी १० जूनला मतदान तर निकाल...

मुंबई: राज्यात लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याचे मतदान काल मंगळवारी ७ मे रोजी पार पाडले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील विधान परिषदेच्या २ शिक्षक आणि २ पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर केले.

विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर आणि कोकण विभाग पदवीधर तर नाशिक विभाग शिक्षक आणि मुंबई शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीचे वेळापत्रक निवडणूक आयोगाने जाहीर केले. या वेळापत्रकानुसार १५ मे २०२४ रोजी नोटीफिकेशन जारी केले जाईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अखेरची




तारीख २२ मे असेल. अर्ज मागे घेण्याची मुदत २७ मे असणार आहे.

या चारही जागांसाठीचे मतदान १० जून २०२४ रोजी होणार आहे. मदानाची वेळ सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत असणार आहे. मतमोजणी १३ जून रोजी होईल. निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया १८ जूनपर्यंत पूर्ण केली जाणार आहे.

विधान परिषदेतील या सदस्यांची मदत संपत आहे

मुंबई पदवीधर मतदासंघाचे विद्यमान आमदार विलास पोतनीस, कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखेर, नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघाचे विद्यमान आमदार किशोर दराडे आणि मुंबई शिक्षक मतदारसंघाचे विद्यमान आमदार कपिल पाटील हे चारही सदस्य ७ जुलै रोजी निवृत्त होत आहेत.

## एअर इंडियाची चक्क ७० हून अधिक उड्डाणे रद्द



मुंबई : अलीकडे झालेले विस्तारा एअरलाइनवरील संकट निवळले नसून इतक्यात एअर इंडियाला आणखी नव्या संकटाला सामोरे जावे लागत आहे. एअर इंडिया एक्सप्रेसने आपली ७० हून अधिक उड्डाणे रद्द केली आहेत. यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असून त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. टाटा समूहाच्या विमान कंपनीच्या प्रवक्त्याने निवेदनात रद्द करण्यात आलेल्या उड्डाणांमध्ये आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत उड्डाणांचा समावेश असून उड्डाणे रद्द होण्याचे कारण सांगितले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एअरलाइनच्या वरिष्ठ क्रू मेंबर्सनी एकाचवेळी आजारी असल्याची रजा दिली आहे. त्यामुळे एअरलाईनला आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत उड्डाणे रद्द करावी लागली आहेत. क्रू मेंबर्स अचानक रजेवर गेल्याने वादाचे संकेत मिळत आहेत. हे प्रकरण नागरी विमान वाहतूक विभागापर्यंत पोहोचले असून अधिकारी या प्रकरणात हस्तक्षेप करत आहेत. दरम्यान, अचानक विमान उड्डाणे रद्द झाल्याने प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे. एअर इंडिया एक्सप्रेसच्या प्रवक्त्याने सांगितले की, एअरलाइनच्या केबिन क्रूच्या एका गटाने मंगळवारी रात्री शेवटच्या क्षणी आजारपणाच्या सुट्ट्या घेतल्या. ज्यामुळे फ्लाइटला उशीर करावा लागला आणि फ्लाइट रद्द करण्यात आली. या घटनांमागील कारणे समजून घेण्यासाठी आम्ही क्रूशी चर्चा करत आहोत. एअरलाइन टीम सक्रियपणे या समस्येकडे लक्ष देत आहेत आणि समस्येचे निराकरण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रवाशांना झालेल्या गैरसोयीबद्दल एअरलाइन दिलगिरी व्यक्त करतो. फ्लाइट रद्द झाल्यामुळे प्रभावित झालेल्या प्रवाशांना पूर्ण परतावा दिला जाईल. किंवा इतर तारखेला फ्लाइट निश्चित होईल, असंही प्रवक्त्याने सांगितलं आहे. प्रवाशांनी विमानतळावर येण्यापूर्वी त्यांचे उड्डाण रद्द झाले आहे की नाही हे तपासावे, असे आवाहन देखील एअर इंडियाकडून करण्यात आले आहे

## मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुटी

छत्रपती संभाजीनगर, दि.८(जिमाका):- कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी विविध आस्थापनांनी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुटी द्यावी,असे आवाहन कामगार उपायुक्त चंद्रकांत राऊत यांनी केले आहे.

यासंदर्भात उद्योग उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने जारी केलेल्या शासन परिपत्रकात नमूद केल्यानुसार, निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मतदानाच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी सुटी देण्यात यावी. निवडणूकीच्या दिवशी हे कामगार निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरी त्यांनाही सुटी देण्यात यावी. सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या, संस्था, औद्योगिक उपक्रम आणि इतर आस्थापनांना ही सुटी लागू राहील. अपवादात्मक परिस्थितीत पूर्ण दिवस सुटी देणे शक्य नसल्यास दोन तासाची सवलत देण्यात यावी. त्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना दोन तासांची सवलत मिळेल व कोणीही मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही याची दक्षता

## भरधाव ट्रकच्या धडकेत एकाच घरातील सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू

जयपूर : राजस्थानमध्ये हायवेवर एक भीषण अपघात झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दिल्ली-मुंबई एक्स्प्रेस-वेवर ट्रक आणि कारची जोरदार धडक लागली असून या अपघातात एकाच घरातील ६ जण ठार झाले. राजस्थानच्या सवाई माधोपूर जिल्ह्यातील बनास नदीच्या पुलाजवळ हा अपघात झाला.

हे कुटुंब सीकर जिल्ह्यातून रणथंबोरच्या त्रिनेत्र गणेश मंदिराकडे जाण्यासाठी निघालं होतं. हायवेवर कार मागून वेगाने येत असताना समोरुन



जाणाऱ्या ट्रकने यु-टर्न घेतला. यानंतर कार थेट जाऊन ट्रकवर आदळली असल्याचा प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला आहे.

दरम्यान, अपघातानंतर पोलिसांनी ट्रक ताब्यात घेतला आहे. मात्र ट्रकचालक फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. राजस्थानमध्ये झालेल्या या अपघातामुळे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा आणि उपमुख्यमंत्री दिव्या कुमारी यांनी या अपघातावर शोक व्यक्त केला आहे.

दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गावर सवाई माधोपूर जिल्ह्यातील बाउली पोलीस स्टेशन परिसरात झालेल्या भीषण रस्ता अपघातात ६ नागरिकांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. संबंधित अधिकाऱ्यांना पीडितांना सर्वतोपरी मदत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती भजनलाल शर्मा यांनी एक्सवरुन दिली आहे.

## होणार कायापालट? बीएमसीतर्फे 'या' धोकादायक इमारतींची यादी जाहीर

### तब्बल १८८ इमारतींचा समावेश

मुंबई : पावसाळा तोंडावर येताच मान्सूनपूर्व कामांना वेग येतो. मुंबई महानगरपालिकेच्या वतीनं दरवर्षी ही मान्सूनपूर्व कामं हाती घेण्यात येतात. त्यामध्ये रस्त्यांची तसेच इमारतींची अशा अनेक कामांचा समावेश असतो. यंदाही पालिकेकडून पावसाळा पूर्व कामांची पाहणी झाली असून त्या कामांची यादी जाहीर झाली आहे.

पालिकेतर्फे धोकादायक इमारतींचे सर्वे



क्षण झाले असून त्यात चक्क १८८ इमारतींचा समावेश असल्याचे सांगितले आहे.

पालिकेच्या सर्वेक्षणानुसार मुंबई शहरातील १८८ इमारती अतिधोकादायक असल्याचं निदर्शनास आलं आहे. या इमारतींमध्ये सर्वाधिक, तब्बर ११४ अतिधोकादायक इमारती मालाड, बोरिवली, मुलुंड, अंधेरी पश्चिम या भागांमध्ये म्हणजेच शहराच्या पश्चिम उपनगरात आहेत. तर, मुंबई शहरात २७ आणि पूर्व उपनगरात ४७ इमारतींची नोंद पालिकेनं केली आहे.

## केरळमध्ये वेस्ट नाईल तापाबाबत अलर्ट जारी राज्यात तापाच्या ६ प्रकरणांची नोंद, एकाचा मृत्यू

तिरुअनंतपुरम : केरळच्या कोझिकोड, त्रिशूर आणि मलप्पुरममध्ये वेस्ट नाईल तापाची ६ प्रकरणे नोंदवली गेली आहेत. तर त्रिशूरमध्ये या तापामुळे एका वृद्धाचा मृत्यू झाल्याची माहिती पुढे आलीय. त्यामुळे केरळच्या आरोग्य विभागाने राज्यात वेस्ट नाईल तापाबाबत अलर्ट जारी केला आहे. यूएस सेंटर फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेंशननुसार, हा आजार मच्छर चावल्याने होतो. तापासोबतच उलट्या, जुलाब आणि डोकेदुखीच्या तक्रारी आहेत. वेस्ट नाईल तापाच्या १० पैकी ६ प्रकरणांमध्ये लक्षणे दिसत नाहीत. अशा परिस्थितीत आरोग्य विभागाने रुग्णांची कोणतीही अधिकृत आकडेवारी शेअर केलेली नाही.



## पाणी द्या... पाणी द्या... आयुक्त साहेब पाणी द्या... : पाण्यासाठी सांगवीकरांचा मनपावर धडकला मोर्चा

तभा वृत्तसेवा
नांदेड, ८ मे -

मागील दहा दिवसांपासून महानगरपालिकेच्या ढिसाळ नियोजनामुळे नांदेड उत्तर भागात पाणी टंचाई निर्माण झाली आहे. पाण्यासाठी नागरिकांचा हाहाकार उडाला आहे. असे असतांनाही कुंभकर्णी झोपेत असलेल्या महापालिका प्रशासनाला जागे करण्यासाठी माजी नगरसेवक प्रतिनिधी श्याम कोकाटे यांच्या नेतृत्वात आज सांगवीकरांनी महानगरपालिकेवर धडक मोर्चा काढला. मपाणी द्या... पाणी द्या... आयुक्त साहेब पाणी द्या...फ असा आर्त टाहो फोडणार्या आंदोलकांचे निवेदन घेण्यासाठीही आयुक्त आंदोलकांपर्यंत आले नाहीत. त्यामुळे आंदोलक चांगलेच भडकले होते.

नांदेड उत्तर भागात गेल्या दहा दिवसांपासून तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे. आपत्कालीन परिस्थितीत पर्यायी उद्धव व्यवस्था म्हणून आसना नदी येथे उभारण्यात आलेल्या बंधार्यातून नांदेड उत्तर भागाला पाणी पुरवठा करता येतो, याची माहिती आयुक्तांना नसावी एवढी केविलवाणी परिस्थिती निर्माण झाली आहे. दहा दिवसांपासून सांगवी भागातील नागरिक घागरभर पाण्यासाठी भटकंती करीत असतांनाही आयुक्तांनी या भागातील जनतेची साधी समस्याही जाणून घेतली नाही. महापालिकेचा कोणताही



अधिकारी टंचाईग्रस्त भागात फिरकला सुद्धा नाही. त्यामुळे जनतेमध्ये संतापाची लाट निर्माण झाली होती. आज पाणी येणार... उद्या पाणी येणार... अशी बतावणी करून जनतेच्या डोळ्यांत धूळफेक करणार्या मह ापालिका प्रशासनाच्या विरोधात अखेर आज संतापाचा उद्रेक झाला. सांगवी प्रभागाचे नगरसेवक प्रतिनिधी श्याम कोकाटे यांच्या नेतृत्वात महापालिकेवर धडक मोर्चा काढण्यात आला. महापालिका प्रशासनाच्या विरोधात छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून मोर्चा काढण्यात आला. महापालिका प्रशासन मुर्दाबादच्या घोषणा देत आंदोलक मनपावर धडकले. यावेळी पोलीस प्रशासनाने आंदोलकांना मनपाच्या दारातच रोखले. मनपा दारासमोर आंदोलकांनी घोषणाबाजी करून परिसर दणाणून सोडला. निवेदन घेण्यासाठी आयुक्त स्वतः खाली आले. या मागणीवर आंदोलक अडल्याने तिथे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मनपाच्या पाणी पुरवठा विभागाच्या अभियंत्याने आंदोलकांशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला; मात्र पाणी आल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, असा पवित्रा आंदोलकांनी घेतल्यामुळे मनपा प्रशासनाचे चांगलीच दमछाक झाली. अखेर आयुक्तांनी सांगवी भागात येत्या बारा तासात मुबलक पाणी पुरवठा करू असे आश्वासन दिले. आंदोलकांच्या शिष्टमंडळाशी त्यांनी चर्चा केली. पाणी पुरवठा करण्याचे आश्वासन दिल्यानंतर तूर्तास आंदोलन मागे घेण्यात आले; परंतु २४ तासात पाणी आले नाही तर शहरात चक्का जाम करू आणि तीव्र आंदोलन छेडू, असा इशारा श्याम कोकाटे यांनी दिला आहे.

चिमुकल्यांना घेऊन महिला आंदोलनात

गेल्या दहा दिवसांपासून पाणी मिळत नसलेल्या संतप्त नागरिकांनी काढलेल्या मोर्चात चिमुकल्या लेकरांसह महिला सहभागी झाल्या होत्या. खांद्यावर चिमुकले बाळ आणि डोक्यावर रिकामी घागर असे विदारक चित्र या आंदोलनात दिसून आले. पाणीबाणी सुरू असतांनाही महापालिका प्रशासन दखल घेत नसल्याने नागरिकांमध्ये संताप निर्माण झाला आहे.



www.tarunbharat.net
तरुण भारत
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.







## निवडणुकायन

### ऑल इज वेल!



**जगाच्या** नकाशावर भारतासारखा दुसरा देश नाही, असे अनेक बाबतीत म्हटले जाते. सध्या भारतवासी अनुभवत असलेल्या निवडणुकीच्या अर्थात् लोकशाहीच्या बाबतीतही भारत जगात अजोडच आहे. म्हणूनच तर तीन दिवसांपूर्वी २५ देशांचे प्रतिनिधी इतक्या मोठ्या लोकशाहीप्रधान देशात निवडणूक कशी पार पडते, हे बघायला, याचा अभ्यास करायला आले. मात्र, आपल्या देशात निवडणुकीदरम्यान प्रत्यक्षात काय घडते, हे जर त्यांनी पाहिले, तर त्यांना चक्कर आल्याशिवाय राहणार नाही. म्हणून त्यांना 'छान छान' असेच सर्व दाखवले जाणार, हे निश्चित आहे.

निवडणूक अधिकारी त्या विदेशी लोकांना सांगतील, आम्ही प्रथम निवडणूक याद्या तयार करतो. प्रत्यक्षात या याद्या कधी तयार होतात, याच्याशी ८० टक्के जनतेला काहीही घेणेदेणे नसते. कोणत्या तरी पक्षाचा प्रतिनिधी घरी खेटा घालून तुमचे नाव यादीत आहे का, पाहून घ्या म्हणून मागे लागतो, तेव्हा नागरिकांना आपले नाव आहे की नाही, याचा साक्षात्कार होतो. अनेकांना तोही होत नाही. ते निवडणुकीआधी आपले नाव यादीत पाहण्याची तसदीही घेत नाहीत. जणू काही राजकीय पक्ष आणि सरकारी यंत्रणा म्हणजे वधू पक्ष आणि हे मतदान करणारे वरपक्षातील लोक. करतील मुलीकडचे लोक, अशा आविर्भावात मतदार राहतात. मग, मतदानाच्या दिवशी आंघोळीपूर्वी सकाळी जाऊन येऊ म्हणजे कटकट संपली, एक काम निपटले. आल्यावर आंघोळ करू, असे म्हणून सकाळी-सकाळी प्रातर्विधी उरकून थेट मतदानाच्या रांगेत जाऊन उभे राहतात.

आपले केंद्र कोणते, खोली कोणती, हेही सांगण्यासाठी वधुपक्षाकडील लोक हजर असतातच, याची या वरपक्षाला खात्री असते. मग खोली क्रमांक अमूक आहे म्हटल्यावर त्या रांगेत उभे राहणार. हजारदा सांगूनही सोबत ओळखपत्र असेलच याचीही खात्री नसते. त्यामुळे आपला नंबर आल्यानंतर ओळखपत्र दाखवा म्हटले की भांबावणार. एकाजणाने तर ओळखपत्र मागितल्यावर आपल्या जन्मतारखेचा दाखला दाखवला म्हणे... तो पाहिल्यावर निवडणूक अधिकाऱ्याने डोक्यावर हात मारला. अहो, हे तुमचे ओळखपत्र म्हणवले जात नाही. एखादे सरकारी डॉक्यूमेंट घेऊन या, असे म्हटल्यावर तो लग्नाचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट घेऊन आला. आता अधिकाऱ्याला चक्कर यायचीच बाकी होती. तरीही वरपक्षाला दुखावता कामा नये, म्हणून त्याने संपूर्ण धीर एकवटून म्हटले, ज्यावर तुमचा फोटो असेल ना, ते ओळखपत्र हवे.

असे एक ना अनेक किस्से मतदानाच्या जानवस्यावर घडतात. पण, शेवटी मतदान झाले की बस्स...आपले कर्तव्य पार पडले, या आविर्भावात वरपक्षाचे वऱ्हाडी घरी जातात आणि निकालाची तमा न बाळगता आपल्या दैनंदिन कामात स्वतःला झोकून देतात. मतदानाला सार्वजनिक सुटी असल्याने अनेकजण सहलीची योजना तयार करतात. आता सरकारने जाहिराती करून-करून सहलीला जाऊ नका किंवा मतदानानंतर जा, असे सांगितल्याने लोक किमान 'वन डे ट्रिप' वगैरे काढत नाहीत, तेवढे बरे.

असे असूनही मतदानाची टक्केवारी सर्वसामान्य विद्यार्थ्याला बोर्डात जेवढे गुण पडावे, तेवढीच असते. म्हणजे काठावर पास. एवढी धावपळ करूनही वधूपक्षाला सारे काही सुरळीत पार पडल्याचे समाधान नाहीच. कारण, सगळी धावपळ करायची, वरपक्षाचे नखरे काही तासांसाठी का असेना उचलायचे आणि शेवटी आपली मुलगीही त्यांच्याच सोबत पाठवायची. किती वेदनादायी अनुभव असतो तो! मतदानाची टक्केवारी पाहून राजकीय पक्ष आणि निवडणूक आयोग दोघांनाही याच वेदना होत असाव्यात. या वेदना ते बाहेर देशांतील प्रतिनिधींना नाही ना दाखवू शकत. आपल्या घरचे कार्य असताना तिथे पाहुण्यांसमोर रडण्याचा प्रकार करायचा का? म्हणून 'ऑल इज वेल' असे भासवायचे आणि प्रतिनिधींनी 'ओह...वॉव' म्हणेपर्यंत त्यांना आपल्या निवडणूक प्रक्रियेची महती सांगायची, हे असे आणि एवढेच घडणार. इथे बाबा रणछोडदासने सांगितलेला मंत्रच सर्वोपरी असतो..'ऑल इज वेल'!!! ■

# वडेट्टीवारांच्या भाषेशी ठाकरे सहमत आहेत का?

### उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा सवाल

◆ **मुंबई, ७ मे**

हेमंत करकरे यांची हत्या अजमल कसाबने केली नाही, असे म्हणणारे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार हे पाकिस्तानचीच भाषा बोलत असूनही काँग्रेसशी आघाडी केलेले उद्धव ठाकरे या विषयावर अद्याप गप्प आहेत. उद्धव ठाकरे यांनी आपण वडेट्टीवार यांच्या आरोपाशी सहमत आहोत, हे जाहीर करावे, असे आव्हान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिले.



मुंबई हल्ल्यातील आरोपींना शिक्षा बजावण्यात ॲड. उज्ज्वल निकम यांनी बजावलेल्या भूमिकेचे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी कौतुक केले होते. मात्र, वडेट्टीवार हे निकम यांच्यावर बेछूट आरोप करीत असताना, मतांच्या लाचारीमुळे उद्धव ठाकरे गप्प बसले आहेत, असेही फडणवीस म्हणाले.

मुंबई भाजपा कार्यालयात मंगळवारी झालेल्या पत्रपरिषदेत ते बोलत होते. महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेसचा नेता पाकिस्तानधार्जिणी वक्तव्ये खुलेआम करीत असताना, उद्धव ठाकरे मात्र मूग गिळून गप्प आहेत. हेमंत करकरे हे अजमल कसाबच्या गोळीनेच हुतात्मा झाले, हे न्यायालयातही सिद्ध झाले असताना, वडेट्टीवार पाकची भाषा बोलत आहेत, असा घणाघात फडणवीस यांनी केला. पाकिस्तानमधील कुणाच्या संपर्कात वडेट्टीवार आहेत, असा सवालही त्यांनी केला.

मुंबई हल्ल्याबाबत न्यायालयात सर्व बाबी स्पष्ट झाल्या आहेत. २६ नोव्हेंबरचा दहशतवादी हल्ला हा पाकिस्तानचा कट होता आणि अजमल कसाबच्या गोळीनेच हेमंत करकरे हुतात्मा झाले, हे न्यायालयात सिद्ध होऊन पाकिस्तान तोंडघशी पडला होता, याचीही आठवण फडणवीस यांनी करून दिली. शेकडो मुंबईकरांचा जीव घेणाऱ्या अजमल कसाबसोबत काँग्रेस असून, भाजपा उज्ज्वल निकम यांच्या पाठीशी आहे, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. ◂(तभा वृत्तसेवा)



बारामती येथील मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी आलेले शरद पवार



बारामती येथे मतदानाचा हक्क पार पाडल्यानंतर सुप्रिया सुळे आणि त्यांचा परिवार



केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी आपल्या परिवारातील सदस्यांसह रत्नागिरी येथे मतदान केले



अजित पवार आणि त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला



अभिनेता रितेश देशमुख यांनी आई वैशाली आणि पत्नी जेनेलिया डिसुझा यांच्यासह लातूर येथे मतदान केले

# पंजाबमध्ये तुटली युती-आघाडी

### जुने दिग्गज निवडणुकीच्या रिंगणात

◆ **चंदीगड, ७ मे**

पंजाबमधील यावेळची निवडणूक अनेक अर्थांनी वेगळी ठरणार आहे. आतापर्यंत केवळ एक-एक किंवा तिरंगी लढती झाल्या होत्या; मात्र यावेळी पक्षांची युती तुटल्याने ही लढत काही ठिकाणी चौरंगी तर, काही ठिकाणी बहुकोनी झाली आहे. शिरोमणी अकाली दल आणि भाजपा व्यतिरिक्त बहुजन समाज पक्षानेही शिरोमणी अकाली दलाशी संबंध तोडले. यावेळी बसपा स्वबळावर निवडणूक लढणार आहे.

इतर राज्यांमध्ये आम आदमी पार्टी इंडिया आघाडी अंतर्गत काँग्रेससोबत युती करून निवडणूक लढवत आहे, पण पंजाबमध्ये दोघेही एकमेकांविरुद्ध उभे आहेत. या सर्वांसोबतच पंजाबमधील जुने दिग्गजही निवडणुकीच्या रणधुमाळीत आपले नशीब आजमावत आहेत. राज्यातील आठ विद्यमान खासदार लोकसभा निवडणूक लढवत आहेत. यावेळी त्यांचा मार्ग सोपा नाही, कारण खडतर स्पर्धेमुळे आव्हान वाढले आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी आम आदमी पार्टी आणि शिरोमणी अकाली दलाने पंजाबमधील सर्व १३ जागांसाठी आपले उमेदवार जाहीर केले आहेत. काँग्रेसने १२ जागांवर तर, भाजपाने ९ जागांवर उमेदवार उभे केले आहेत.

काँग्रेसने अमृतसरमधून गुरजितसिंग औजला आणि फतेहगड साहिबमधून डॉ. अमर सिंग यांच्यासह दोन विद्यमान खासदारांना उमेदवारी दिली. त्याचप्रमाणे भाजपाने लुधियानामधून विद्यमान खासदार रवनीत सिंग बिट्टू, जालंधरमधून सुशील रिंकू पटियाळामधून प्रणीत कौर आणि फरीदकोटमधून हंस राज हंस यांना उमेदवारी दिली आहे. ◂(वृत्तसंस्था)

ऑनलाईन तभा वाचण्यासाठी
www.tarunbharat.net
वर भेट द्या!

# काश्मीर खोऱ्यातील तीन जागा भाजपा उमेदवार नाही

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, ७ मे**

भाजपाने काश्मीर खोऱ्यातील श्रीनगर, बारामुल्ला आणि अनंतनाग-राजौरी या तीन जागा न लढवण्याची घोषणा केली आहे. त्याचप्रमाणे डेमोक्रेटिक प्रोग्रेसिव्ह आझाद पार्टीचे गुलाम नबी आझाद यांनीही रिंगणातून माघार घेतली. भाजपा आणि आझाद यांनी असा निर्णय का घेतला, याची चर्चा होणे स्वाभाविक आहे.

जम्मू-काश्मिरात लडाखसह लोकसभेच्या सहा जागा आहेत. यातील तीन जागा काश्मीर खोऱ्यात, दोन जागा जम्मू भागात, तर एक जागा लडाखमध्ये आहे. म्हणजे लडाखसह लोकसभेच्या सहापैकी तीन जागा न लढवण्याचा निर्णय भाजपाने घेतला आहे.

जम्मू आणि उधमपूर या दोन जागा जम्मू भागात आहे, तर एक जागा लडाखमध्ये आहे. या तीन जागा भाजपा लढवत आहे. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३५ ए आणि ३७० कलम रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय भाजपाने घेतला. या निर्णयाचे देशभर अभूतपूर्व स्वागत झाले. हा निर्णय घेताना केंद्र सरकारने विधानसभा निलंबित करत जुन्या जम्मू, काश्मीर आणि लडाख असे दोन केंद्रशासित प्रदेशात रूपांतर केले. त्यामुळे भाजपा यावेळी लोकसभेच्या सहाही जागा लढवेल, असे वाटत होते, पण भाजपाने काश्मीर खोऱ्यातील लोकसभेच्या तीन जागा न लढवण्याचा निर्णय घेत सगळ्यांना आश्चर्याचा धक्का दिला.

लोकसभा निवडणुकीच्या पाठोपाठ राज्यात विधानसभा निवडणुकाही व्हायच्या आहेत. जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा तसेच विधानसभा निवडणूक ३० सप्टेंबरपर्यंत घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिला आहे. केंद्रशासित प्रदेश झालेल्या जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा मिळण्याची राज्यातील जनतेची मागणी आहे. विशेष म्हणजे, भाजपाने तसे आश्वासनही दिले आहे.

जम्मू आणि काश्मिरातील पाच लोकसभा मतदारसंघात पाच टप्प्यात मतदान होत आहे. यापैकी उधमपूरला १९ एप्रिलला तर जम्मूत २६ एप्रिलला मतदान झाले. अनंतनाग-राजौरीत ७ मेला होणारे मतदान पुढे ढकलण्यात आले. श्रीनगरमध्ये १३ मेला तर बारामुल्लात २० मेला मतदान होणार आहे. लडाखमध्ये पाचव्या टप्प्यात २० मेला मतदान होणार आहे. ■

# पालघरचे खासदार डॉ. राजेंद्र गावित पुन्हा भाजपात

◆ **मुंबई, ७ मे**

शिवसेनेने तिकीट नाकारल्याने नाराज असलेले शिवसेनेचे पालघरमधील विद्यमान खासदार डॉ. राजेंद्र गावित यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र करीत भाजपात प्रवेश केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला.

खा. गावित यांचे स्वागत करताना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, आमदार, खासदार आणि आदिवासी विकास मंत्री असा राजकारणातील मोठा अनुभव गाठीशी असणाऱ्या राजेंद्र गावित यांचा एका अर्थी भाजपात पुनर्प्रवेश झाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संमतीनेच गावित यांचा भाजपा प्रवेश झाला. खा. गावित यांच्या अनुभवाचा फायदा दिल्लीपेक्षा राज्यात अधिक होणार आहे. या दृष्टीने त्यांच्या संमतीनेच पालघरमध्ये भाजपाने लोकसभा निवडणुकीसाठी हेमंत सावरा यांना उमेदवारी दिली. खा. गावित यांच्या कार्यकर्तृत्वाचा यथोचित सन्मान राखला जाईल.

देवेंद्र फडणवीस यांच्यावर आपला पूर्ण विश्वास आहे. फडणवीस राजकारणात दिलेला शब्द पाळणारे नेते आहेत. यापुढे भाजपा नेतृत्व जी जबाबदारी सोपवेल, ती प्रामाणिकपणे पार पाडेन, असे खा. गावित यांनी सांगितले. ◂(तभा वृत्तसेवा)

# अनंतनाग-राजौरीचे मतदान खराब हवामानामुळे पुढे ढकलले



◆ **नवी दिल्ली, ७ मे**

अनंतनाग-राजौरी मतदारसंघात तिसऱ्या टप्प्यात म्हणजे ७ मेला मतदान होणार होते, पण त्या भागात बर्फवृष्टी सुरू असल्याने निवडणूक घेणे शक्य नसल्यामुळे निवडणूक आयोगाने तेथील निवडणूक पुढे ढकलली आहे, आता या मतदारसंघात सहाव्या टप्प्यात म्हणजे २५ मेला मतदान होणार आहे.

भाजपासह राज्यातील प्रमुख राजकीय पक्षांनी येथील मतदान पुढे ढकलण्याची मागणी केली होती. त्यामुळे आयोगाला हा निर्णय घ्यावा लागला.

पीडीपीच्या नेत्या मेहबुबा मुफ्ती या मतदारसंघातून रिंगणात आहे. गुलाम नबी आझाद यांनी अनंतनाग-राजौरी मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची घोषणा केली होती, पण त्यांनी शेवटच्या क्षणी माघार घेतली.

अनंतनाग-राजौरीचे वैशिष्ट्य म्हणजे येथे काही भाग काश्मीर खोऱ्याचा तर काही भाग जम्मूतील आहे. या मतदारसंघातील अनंतनाग काश्मीर खोऱ्यात येते. जम्मूचा पूंछ जिल्हा आणि राजौरीचा मोठा भागही या मतदारसंघात येतो. या लोकसभा मतदारसंघात विधानसभेच्या १८ जागा आहेत, यातील ११ जागा काश्मीर खोऱ्यातील सात जागा पूंछ राजौरी भागातील आहे.

जम्मू कश्मीरमध्ये भाजपा, काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स, पीडीपी तसेच गुलाम नबी आझाद यांच्या पार्टीसह आणखी काही राजकीय पक्ष आहेत. राज्यात काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स यांची आघाडी आहे. काश्मीर खोऱ्यातील तीन जागा नॅशनल कॉन्फरन्स लढवत असून जम्मू, उधमपूर आणि लडाख या जागांवर त्याने काँग्रेसला पाठिंबा दिला आहे.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राज्यातील सहापैकी तीन जागा भाजपा आणि तीन जागा नॅशनल कॉन्फरन्सने जिंकल्या होत्या. जम्मू, उधमपूर आणि लडाखमध्ये भाजपाला विजय मिळाला होता, तर श्रीनगर, बारामुल्ला आणि अनंतनाग राजौरी नॅशनल कॉन्फरन्स जिंकले होते. मेहबबा मुफ्ती यांच्या पीडीपीला त्यावेळी एकही जागा जिंकता आली नव्हती. उमर अब्दुल्ला यावेळी श्रीनगर मतदारसंघ सोडून बारामुल्लातून निवडणूक लढवत आहे. अब्दुल्ला यांनी आपला मतदारसंघ का बदलला, याचीही राज्यात चर्चा आहे. मात्र, भाजपा काश्मीर खोऱ्यातील तीन जागा का लढवत नाही, याचा पक्षातर्फे आतापर्यंत कोणताही अधिकृत खुलासा करण्यात आला नाही. ◂(तभा वृत्तसेवा)

# माढ्यात कांद्याने दाबले ईव्हीएमचे बटण!

◆ **माढा, ७ मे**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यांतर्गत राज्यातील ११ मतदारसंघांत निवडणूक झाली. त्यात एका कांदा उत्पादक शेतकऱ्याचा व्हिडीओ चांगलाच व्हायरल झाला आहे. या व्हिडीओत हा शेतकरी ईव्हीएमवर कांदा ठेवतो आणि त्यानंतर एका विशिष्ट पक्षाचे बटण दाबतो. त्याची ही कृती केंद्राच्या कांदा निर्यात बंदीविरोधात असल्याचे मानले जात आहे.

माढा लोकसभा मतदारसंघात मंगळवारी सुरू असलेल्या मतदानात एका शेतकऱ्याने कांद्याने ईव्हीएमवरील बटण दाबून केंद्राच्या कांदा निर्यातबंदीविरोधातील आपला रोष व्यक्त केला. हा शेतकरी करमाळा तालुक्यातील एका गावचा असल्याची माहिती आहे. त्याच्या व्हायरल झालेल्या व्हिडीओत दिसले की, तो प्रथम ईव्हीएमवरील सत्ताधारी पक्षाच्या चिन्हापुढे एक छोटासा कांदा ठेवतो. त्यानंतर तो कांदा उचलून तो थेट विरोधी पक्षाच्या उमेदवाराच्या नावापुढील बटण दाबतो. त्यानंतर व्हीव्हीपॅट मशीनमध्ये त्या उमेदवाराचे नाव व चिन्ह दिसते. हा व्हिडीओ चांगलाच व्हायरल झाला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# चपलांची माळ, गाढवावर स्वार; आगळावेगळा अपक्ष उमेदवार

### अर्ज भरताना अनोखी शैली

◆ **पाटणा, ७ मे**

देशात लोकसभा निवडणुका सुरू आहेत. मतदानाचा तिसरा टप्पाही पूर्ण झाला आहे. उरलेल्या मतदारसंघात ठरलेल्या तारखांना मतदान होणार आहे. त्याआधी राजकीय पक्षांचे नेते आपल्या नेत्यांसह आणि कार्यकर्त्यांसह उमेदवारी अर्ज भरत आहेत. अनेकांच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत, पण बिहारमध्ये एक अपक्ष उमेदवार चक्क गाढवावर बसून अर्ज भरायला गेला.

बिहारमधील वाल्मीकिनगर लोकसभा मतदारसंघात गाढवावर बसून उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी गळ्यात चपलांची माळ घालून पोहोचलेल्या उमेदवाराचा व्हिडीओ समाज माध्यमावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. उमेदवाराची ही आगळीवेगळी शैली पाहण्यासाठी बघ्यांची गर्दी जमली होती.

वाल्मीकिनगर मतदारसंघातील अपक्ष उमेदवार सय्यद हवारी हे बूट आणि चपलांची माळ घालून आणि छत्री घेऊन गाढवावर स्वार होऊन उमेदवारी दाखल करण्यासाठी आले होते. दरम्यान, उमेदवार गाढवावरून खाली पडला, हे पाहून लोक हसू लागले. मात्र, उमेदवाराच्या या हटके शैलीचा व्हिडीओ समाज माध्यमावर व्हायरल होत आहे.



या पद्धतीने उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आलेले उमेदवार सय्यद हवारी संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय बनले असून, लोक प्रतिक्रिया व्यक्त करीत आहेत. सय्यद हवारी यांनी सांगितले की, मी एका गरीब मजुराचा मुलगा आहे आणि मला नेहमी जनतेच्या चपलेखाली राहायचे आहे. मी काही मोठा नेता नाही, लोक मला ओळखतही नाहीत. त्यामुळे गाढवावर स्वार होऊन आणि चपलांची माळ घालून उमेदवारी दाखल करण्यासाठी आलो, जेणेकरून मी जनतेला आकर्षित करू शकेन. लोक मला ओळखत नसल्यामुळे लोक माझ्याकडे आकर्षित होऊ शकतात. ◂(वृत्तसंस्था)

# गुजरातमधील नवसारीमध्ये मराठीचाच 'आवाज'

### चर्चा विजयाची नव्हे, मताधिक्याची!

◆ **नवसारी, ७ मे**

मराठी भाषिक लोकप्रतिनिधी आणि मतदारांचा दबदबा असलेल्या गुजरातमधील नवसारी लोकसभा मतदारसंघात यावेळीही मराठी माणसांचाच बोलबाला आहे. गेल्यावेळी देशात सर्वाधिक मताधिक्याने निवडून आलेले भारतीय जनता पक्षाचे विद्यमान खासदार सी. आर. पाटील यावेळी चौथ्यांदा रिंगणात असून, ते विजयी होतील का, यापेक्षा मताधिक्याचा विक्रम ते मोडतील का, याचीच चर्चा त्या मतदारसंघात सुरू आहे.



गुजरातमधील नवसारी लोकसभा मतदारसंघ २००८ मध्ये मतदारसंघ पुनर्रचनेत अस्तित्वात आला. त्यानंतर २००९ पासून सलग तीनवेळा सी. आर. पाटील हे त्या मतदारसंघातून निवडून आले आहेत. विशेष म्हणजे, सर्वाधिक मताधिक्याने निवडून येण्याचा विक्रमही त्यांनी गेल्या निवडणुकीत केला. ते २०१४ मध्ये पाच लाख ५८ हजार १२२, तर २०१९ मध्ये सहा लाख ८९ हजार ६६८ मतांनी विजयी झाले होते.

यावेळी नवसारी मतदारसंघात एकूण १४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असले तरी खरी लढत भाजपाचे सी. आर. पाटील आणि काँग्रेसचे नैशदभाई भूपदभाई देसाई यांच्यातच आहे. या लोकसभा मतदारसंघात लिंबायत, उधना, चोरयासी, गणदेवी, जालापूर, मजुरा आणि नवसारी असे एकूण सात मतदारसंघ आहेत. सातही ठिकाणी सध्या भाजपचेच आमदार आहेत. त्यातही लिंबायतमधील आमदार संगीता पाटील या महाराष्ट्रीयन आहेत. सी. आर. पाटील हेदेखील खान्देशातीलच जळगाव जिल्ह्याचे सुपुत्र असून, गुजरात भाजपाचे ते प्रदेशाध्यक्ष आहेत. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
www.dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, ०९ मे २०२४ वर्ष दुसरे अंक ४८ पाने : ८ किंमत रु. ६/- Date : Thu. 09 May 2024 Volume 02 Issue 48 Page 8 Price : 6/-




# तालुक्यात उष्णतेचा उच्चांक; उन्हाच्या तीव्रतेमुळे शेतकऱ्यानी बदलल्या कामाच्या वेळा

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.०८ मे- तालुक्यात मे महिन्यामध्ये सुर्य तळपताना दिसून येत आहे. उन्हाच्या तीव्रतेने उन्हाळी पिके माना टाकत आहे. शेतकरी शेतमजूर कामाच्या वेळा बदलून सकाळच्या वेळेस शेती कामास प्राधान्य देताना दिसून येत आहे. शेतकऱ्यांनी सद्यस्थितीत अतिउष्णतेत श्रमाची व मेहनतीचे कामे टाळावीत असा सल्ला कृषी विभागाकडून देण्यात येत आहे.

यंदा रब्बी व उन्हाळी हंगामाच्या सिंचनासाठी उपलब्ध पाणी साठ्यावर कांदा लागवड, कांदा बिजात्पोदन, उन्हाळी बाजरी, गव्हाचा व मक्का पिकाचा पेरा मोठ्या प्रमाणावर झाला आहे. उन्हाळी मशागतीचे कामे शेतकरी भर उन्हात करत आहे. यंदा प्रथमच २५ एप्रिल नंतर तापमानात मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याने तापमाण ४० डिग्री सेल्सीयसच्या वर पोहचले आहे. या उन्हाच्या तीव्रतेचा परिणाम म्हणजे शेतकरी व शेतमजूरी करणारे मजूर दुपारची कामे सकाळी उरकताना दिसून येत आहे. सकाळी ८ ते १२ वाजे दरम्यान व दुपारी ४ ते ६ या वेळा शेत कामासाठी उत्तम असल्याचे शेतकरी महिलांचे म्हणने आहे. कांदा काढणी व बाजरी सोंगणीकडे कल असून सदर कामे भर उन्हात करावी लागतात . यंदाच्या उष्णतेच्या लाटेत ते शक्य नसल्याने हा बदल शेतीकामात केल्याचे दिसून येत आहे.



यंदा, एप्रिल व मे महिन्यात उष्णतेचे प्रमाण दरवर्षी पेक्षा जास्त आहे . शेतकऱ्यांनी शेतात काम करताना डोके व कान झाकलेले असावे, नियमित भरपूर पाणी प्यावेत. कामात बदल करत सकाळ च्या सत्रात शेतात काम करावे, शक्यतो दुपारी १२ ते दुपारी चार वाजे दरम्यान अती उन्हात काम करणे टाळावे.

-बाळराजे मुळीक, ता. कृषी अधिकारी कन्नड

उन्हाच्या तीव्रतेने शेतकरी हवालदिल झाले आहेत, शेती कामे सकाळी आटोपण्यावर भर दिला आहे. दुपारी १२ ते चार वाजेदरम्यान श्रमाची व मेहनतीचे कामे टाळणे अत्यंत महत्त्वाचे आहे,तर दुपारच्या वेळेस दुभती व पाळीव गुरे सावलीत बांधण्यात येत आहेत.

-विठ्ठल खंडागळे, शेतकरी हतनूर

# मिशन -७५ उपक्रमांतर्गत सर्वाधिक मतदानासाठी सन्मान लोकशाहीचे पुरस्कार

## जिल्हाधिकाऱ्यांचे मतदारांना आवाहन पत्र

अहमदनगर दि.७ - भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात मतदानाचा टक्का वाढवून लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी मतदारांना उद्देशून लिहिलेल्या लोकशाहीचा उत्सव- अहमदनगर जिल्हा मिशन ७५ या संकल्पनेच्या पत्रात केले आहे.

भारताने नुकताच स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्याचा अमृत महोत्सव साजरा केला.आपल्या अहमदनगर जिल्ह्याचा व भारतीय स्वातंत्र्याचा अत्यंत महत्त्वाचा संबंध आहे. म्हणून येत्या १३ मे २०२४ रोजी होणाऱ्या अहमदनगर व शिर्डी लोकसभा मतदारसंघांमध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये ७५टक्क्यांपेक्षा अधिक मतदान करणाऱ्या गाव ,शहर , उद्योग, कंपन्या ,महाविद्यालयाचे युवा मतदार तसेच हाउसिंग सोसायटी यांच्यासाठी सन्मान लोकशाहीचे पुरस्कार जिल्हाधिकारी कार्यालयाचे वतीने प्रदान केले जाणार आहेत.

७५ % पेक्षा अधिक मतदान करणाऱ्या गावांचा लोकशाहीचे शिलेदार हा मानाचा पुरस्कार देऊन गौरव केला जाणार आहे.उद्योजकीय क्षेत्रामधील कंपन्यांच्या १०० % मतदानासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने त्यांना सुपर वोटर अवॉर्ड दिला जाणार आहे. युवा नवमतदारांच्या १०० % मतदानासाठी महाविद्यालयांना युवाभारती पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.हाऊसिंग सोसायटयांना १००% मतदानासाठी लोकशाहीचे शिल्पकार हा मानाचा सन्मान प्रदान केला जाणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासनाच्या वतीने मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी , सावलीसाठी मंडप व्यवस्था ,वृद्धांना मदतीसाठी स्वयंसेवक ,मतदार मदत कक्ष , दिव्यांगांसाठी रॅम्प , शौचालय आवश्यक तेथे आदी सेवा पुरवण्याचे नियोजन आहे.यातून सकारात्मकता वाढीस लागून मतदानाची टक्केवारी निश्चितच वाढणार आहे.जगातील सर्वात सक्षम लोकशाही असलेल्या भारताच्या चुनाव का पर्व देश का गर्वया निवडणुकांच्या उत्सवात प्रत्येकाने हिरीरीने सहभागी व्हावे व स्वतःला व समाजाला अभिमान वाटेल असे मतदान करून जिल्हा राज्यात.. देशात अग्रेसर बनवायचा आहे.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सालीमठ यांनी केले. सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असून आपापल्या आस्थापनातील एकूण मतदार व १३ मे २०२४ रोजी मतदान केलेले मतदार व ७५टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झालेले आहे, असा अहवाल महाविद्यालयांनी शिक्षणाधिकारी यांच्याकडे ,हाउसिंग सोसायटीच्या प्रतिनिधींनी जिल्हा उप निबंधक- सहकारी संस्था यांच्याकडे , उद्योजक व कामगार यांच्या प्रतिनिधींनी सहाय्यक कामगार आयुक्त यांच्याकडे,एमआयडीसी मधील कंपन्यांनी उपअभियंता- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडे,गाव प्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांच्याकडे १७ मे २०२४ पर्यंत सादर करावा.

# उमेदवारांची निवडणूक खर्चाची द्वितीय तपासणी संपन्न

## अंतीम तपासणी ११ मे रोजी

शिर्डी, दि.८ मे २०२४ - खर्च निरीक्षक ममता सिंग यांच्या उपस्थितीत शिर्डी लोकसभा मतदारसंघातील सर्व उमेदवारांची निवडणूक खर्चाची द्वितीय तपासणी राहाता येथील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय येथे पार पडली. या तपासणीस सर्व २० उमेदवारांपैकी काही उमेदवार स्वत: व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. याप्रसंगी निरीक्षक ममता सिंग यांनी स्वतः सर्व उमेदवारांच्या खर्चाच्या नोंदवह्यांची काटेकोरपणे तपासणी केली. प्रथम तपासणीनंतर उमेदवारांच्या खर्चाचे दैनंदिन नोंदवही मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे. अंतीम तपासणी ११ मे रोजी पार पडणार आहे. या तपासणीस सर्व उमेदवारांनी त्यांच्या खर्च नोंदवह्यांसह उपस्थित रहावे. उमेदवारांनी निवडणूकीसाठी उघडण्यात आलेल्या बँक खात्यामार्फतच खर्च करण्यात यावा. असे आवाहन खर्च निरीक्षक ममता सिंग यांनी केले आहे.या तपासणीला सहायक समन्वय अधिकारी (खर्च) बाबासाहेब घोरपडे व सचिन धस, सहायक खर्च निरीक्षक विवेक वर्मा, लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता कैलास ठाकरे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# सुबोध भावे यांनी त्यांची बायको मंजिरी हिला दिल्या अनोख्या अंदाजात शुभेच्छा!

सुबोध भावे हे मराठी चित्रपट आणि दूरदर्शन क्षेत्रांतील एक अग्रगण्य आणि प्रतिष्ठित अभिनेते आहेत. त्यांचं काम अत्यंत कौतुकास्पद आणि लोकप्रिय आहे. सुबोध भावे त्यांना गौरव, सन्मान आणि प्रेम मिळते आहे. त्यांच्या कामामुळे त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत आणि मराठी चित्रपटसृष्टीत विश्वास संपादन केला आहे.

सुबोध भावे आपल्या सोशल मिडियाद्वारे आपल्या चाहत्यांना त्यांच्या आयुष्यतल्या विशेष अनुभवांबद्दल नेहमीच सांगत असतात. त्यांचा चाहतावर्ग यांच्या सोशल मिडियावर नजर ठेवून असतो.



सुबोध भावे यांनी आपल्या सोशल मिडियावर एक अनोखा आणि विशेष असा व्हिडिओ शेअर केला आहे. तो विशेष यासाठी आहे की आजच्याच दिवशी ६ मे १९९१ रोजी सुबोध यांनी त्यांची पत्नी मंजिरी हिला प्रपोझ केलं होतं आणि आज तब्बल ३३ वर्षांनी सुबोध यांनी त्या दिवसाला उजाळा दिला आणि मंजिरीला शुभेच्छा दिल्या आहेत.

मराठी चित्रपट आणि दूरदर्शन उद्योगात अभिनय करणारे लोकप्रिय अभिनेते सुबोध भावे यांनी आज त्यांच्या पत्नीला ३३व्या प्रपोझल दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्याचा एक अनोखा विचार केला. त्यांची पत्नी मंजिरी यांना शुभेच्छा देताना सुबोध यांनी मंजिरीबद्दलचे आपले प्रेमही व्यक्त केले, पण या व्हिडिओची खास गोष्ट ही आहे की या व्हिडिओत सुबोध यांचा चेहरा चक्क तरुणपणातल्या सुबोधसारखा आहे! प्रेक्षक या व्हिडिओमुळे खूश झाले आहेत कारण सुबोध यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला आहे. त्याशिवाय या व्हिडिओ दरम्यान सुबोध यांना त्यांच्या प्रेमकथेची आठवण झाली कारण आजच्याच दिवशी त्यांचा प्रपोझल दिवस होता. सुबोध यांनी ही खास गोष्ट प्रेक्षकांसोबत शेअर केली आहे. हा व्हिडिओ पाहून मंजिरीसोबतच त्यांचे चाहतेही खूश आहेत, कारण ३३ वर्षांनंतरसुद्धा सुबोध यांनी आजच्या दिवसाचे महत्त्व जपून मंजिरीला आठवणीने शुभेच्छा दिल्या. त्यांनी मंजिरी वरील आपले प्रेम व्यक्त केले. सुबोध म्हटले आहेत कि जगण्यासाठी श्वासाची नाही तर प्रेमाची गरज असते. एक आदर्श जोडीदार कसा असावा, हे त्यांनी दाखवून दिले आहे.

आपली पत्नी मंजिरी हिला आगळ्या अंदाजात शुभेच्छा देत सुबोध यांनी तिचं मन जिंकलं आहे!

# म्या मतदान केलय तूम्या बी मतदान करा !

## १०३ वर्षाच्या आजोबांचे मतदारांना आवाहन



तभा वृत्तसेवा

कन्नड दि.०८ मे-निवडणुकीसाठी मतदान करण्याची इच्छा असूनही वयोमानामुळे व अपंगत्वाने ते शक्य होत नव्हतं, म्हणून या लोकसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने ज्येष्ठ नागरिक व अपंगांना घरबसल्या मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या सुविधेअंतर्गत ८५ वर्षावरील वृध्द आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असणाऱ्या मतदारांना घरबसल्या मतदान करता येत आहे. हे मतदान घेण्यासाठी खास पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. ज्या मतदारांनी १२ ड अर्जाद्वारे टपाली मतदानाचा पर्याय निवडला आहे अशा मतदाराच्या घरी जाऊन हे पथक मतदान घेत आहे. या सुविधेमुळे वासडी तालुका कन्नड येथील जेष्ठ नागरिक वयाची १०३ वर्ष पार केलेले रावण नामदेव निकम ह्यांच्या घरातच मतदान केंद्राची रचना करण्यात आली होती. गुप्त मतदान पध्दतीने त्यांनी मतपत्रिकेवर आपले मत नोंदविले. मतपत्रिकेची नियमानुसार घडी घालण्यात येऊन ती पाकिटबंद करून सीलबंद करण्यात आली. संपूर्ण प्रक्रियेदरम्यान त्यांच्या चेहऱ्यावर हास्य दिसत होते, जे व्हिडिओवर रेकॉर्ड केले जात होते. म्या मतदान केलं तूम्या बी १३ तारखेला मतदान करा असे आवाहन १०३ वर्षाच्या रावण नामदेव निकम यांनी मतदारांना केले आहे. मतदानाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे काम मतदान केंद्राध्यक्ष विनोद पवार, मतदान अधिकारी मंगेश तायडे निरीक्षक विलास सोनवणे पोलिसअधिकारी संतोष गुणावत व्हिडिओ ग्राफर आण्णासाहेब गायके.बीएलओ अतुल कापुरे, बीएलओ दिनेश निकम यांनी पाहिले.

# बाबाजी भक्तपरिवाराच्या पाठिंब्यासाठी उमेदवाराची वेरुळात बाबाजीची भेट

## अक्षय त्रुतीयाच्या मुहूर्तावर होणार पाठिंबा जाहिर

तभा, वृत्तसेवा / संतोष करपे

खुलताबाद : छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील लोकसभा निवडणुकीसाठी उभा असलेल्या उमेदवारानी बुधवारी वेरुळ येथे श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शान्तिगीरीजी महाराजाची भेट घेवून जय बाबाजी भक्त परिवाराचा पाठिंबा मिळावा अशी विनंती केली छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जय बाबाजी भक्त परिवाराची राजकीय दृष्ट्या निर्णय घेण्यासंदर्भात महत्त्वाची मीटिंग बुधवारी आयोजित केलेली होती.

या निमित्ताने श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी महाराज यांची श्री क्षेत्र वेरूळ येथे उपस्थिती होती यादरम्यान छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उमेदवार श्री संदिपानजी भुमरे, विद्यमान खासदार इम्तियाज जलील, अपक्ष उमेदवार डॉक्टर जीवन राजपूत, अपक्ष उमेदवार जेके जाधव साहेब, अपक्ष उमेदवार संजय भास्कर शिरसाट व शिर्डी मतदार संघातील अपक्ष उमेदवार श्री भारत संभाजी भोसले या सर्वांनी बाबाजींचे आशीर्वाद घेतले बुधवारी झालेल्या बैठकीमध्ये सात मतदारसंघांमध्ये पाठिंबा देण्या संदर्भाचे निर्णय अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर दिनांक दहा तारखेला घेण्यात येणार असून तो निर्णय सर्व प्रसिद्धी माध्यमांना अधिकृतपणे कळवण्यात येईल आज कुठल्याही उमेदवारा संदर्भात पाठिंबाचा निर्णय झालेला नाही असे जय बाबाजी भक्त परिवाराचे वतीने राजकीय समितीचे प्रमुख राजेंद्र पवार यांनी कळविले असून या भेटीदरम्यान जिल्हा संपर्क सेवक शेकनाथ दादा होळकर, जनार्दन अण्णा रिठे, राजाभाऊ पानगव्हाणे, राजू चव्हाण, कवराजी पाटील, श्रीकांत दादा बोडके, रमेश सागजकर, संदीप मोडके कैलास पाटील कुराडे सह असंख्य जय बाबाजी भक्त परिवाराच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.





# पैठण तालुक्यातील शिवसेनेचे (शिंदे गटाचे) सर्व कार्यकर्ते प्रचारासाठी संभाजीनगरकडे,भाजपा एकाकी...

## खा. दानवे यांची पैठण मतदार संघात अग्नीपरिक्षा

तभा वृत्तसेवा / अरुण देविदास

बिडकीन दि ८ में जालना लोकसभा मतदारसंघात भाजप - काँग्रेस अशी थेट लढत होण्याची चिन्हे दिसून येते आहेत खा. रावसाहेब दानवे सहाव्यांदा विजयी षटकार मारणार का काँग्रसचे डॉ. कल्याण काळे मागील पराभवाचा वचपा काढणार अशी चर्चा पैठण तालुक्यांत मतदारांमध्ये सुरू आहे दरम्यान महायुती असताना भाजप एकाकी किल्ला लढवत आहे त्यास कारण ही तसेच आहे छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघात शिंदे गटाकडून पालकमंत्री संदिपान भुमरे यांना उमेदवारी मिळाल्याने पैठण तालुक्यातील शिवसेना (शिंदे गटाचे) सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते संदिपान भूमरे यांच्या प्रचारासाठी छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदार संघात तळ ठोकून आहेत अशी चर्चा पैठण तालुक्यात मतदारांमध्ये होत आहे, तसेच महायुतीतील घटक पक्ष असलेला अजित पवार गटातील राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते नाराज असल्याने दिसत आहे व त्यांचे कार्यकर्ते प्रचारापासून अलिप्त आहेत तसेच मनसे पण मनापासून काम करताना दिसत नाहीत दरम्यान गेल्या सण २००९,२०१४, व २०१९ च्या निवडणुकीत पैठण तालुका हा खा.दानवे यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा होता त्यामुळे पैठण विधानसभा मतदार संघातून मोठे मताधिक्य खासदार दानवे यांना यश मिळाले होते मात्र यंदा मराठा आरक्षण,धनगर आरक्षण,जात पातीचे राजकारण सुरू असल्याने दानवे यांची चांगलीच अग्नीपरिक्षा होणार आहे तसेच पैठण तालुक्यातील शिवसैनिक दानवे यांच्या प्रचारात सक्रिय सहभागी नसल्याने पैठण तालुक्यात प्रचारात भाजपा एकाएकी पडल्याचे चित्र पैठण विधानसभा मतदारसंघात पाहवयास मिळत आहे तर दुसरीकडे महाविकास आघाडीचे सर्व घटक पक्षाचे प्रमुख नेते व पदाधिकारी डॉ. कल्याण काळे यांच्या प्रचारासाठी जिवाचे रान करीत आहेत त्यामुळे दानवे व काळे यांच्यात कडवी लढत होण्याची शक्यता आहे तसेच दलीत, मुस्लिम व कुणबी मराठा समाजाची एकगठ्ठा मते कल्याण काळे यांच्या पारड्यात जाणार असल्याची चर्चा आहे त्यामुळे ओबीसी समाजावर दानवे यांची भिस्त आहे,





राजकीय वार्तापत्र
अरूण देविदास

### काँग्रेस नेत्यांना अती आत्मविश्वास नडणार

एकीकडे भाजपने प्रचारात आघाडी घेतली असताना दुसरीकडे मात्र पैठण तालुक्यातील काँगेस पक्षाचे नेत्यांना डॉ. काळे यांचाच विजय होणार असल्याच्या आभिर्भावात वावरत असून शहर व परिसरात काँगेस पक्षाचा प्रचार कुठेच दिसून येत नाही त्यामुळे डॉ काळे यांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे काँग्रेस पक्षाच्या नेत्यांना विजय आपलाच होणार असल्याच्या फाजिल अती आत्मविश्वास नडणार असल्याचे मतदारांमध्ये बोलले जात आहे दरम्यान पैठण शहरात किंवा बिडकीन येथे भाजप व काँग्रेस पक्षाकडून मोठ्या पदाधिकाऱ्याची एक सभेचे आयोजन अद्याप तरी करण्यात आले नाही त्यामुळे ही मतदारांमध्ये आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे

### भाजपचा डोअर टु डोअर प्रचारावर भर.

पैठण तालुका व शहरात भाजप पक्षाच्या वतीने डोअर टू डोअर प्रचार सुरु असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या विकास कामे ,मोदी गॅरंटी मतदार पर्यंत पोहचविण्याचे काम भाजपचे कार्यकर्ते करीत आहेत त्यामुळे काँगेस प्रचारात पिछाडीवर तर भाजप प्रचारात आघाडीवर आहे शहर व परिसरात डोर टू डोअर प्रचारावर भर दिल्याने भाजपने प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे.

## अग्रलेख...

# काँग्रेसी आलमपनाह...

झारखंड राज्याचे ग्रामीण विकास मंत्री आलमगीर आलम यांच्या स्वीय सहायक अर्थात पीएच्या नोकराच्या घरातून अंमलबजावणी संचालनालय अर्थात ईडीने ३३ कोटी रुपयांची रोख रक्कम जप्त केली. नवल रकमेचे नाही. नेत्यांशी संबंधित असलेल्या व्यक्तीकडून रोकड जप्त झाली, हीसुद्धा नवलाई नाही. अशा घटना आपल्या भारत देशात नेहमीच घडत असतात. यातले धक्कादायक असे की, पीएच्या नोकरांपर्यंत अख्खी व्यवस्था भ्रष्टाचाराच्या समांतर अर्थव्यवस्थेशी एकरूप झालेली असल्याचा हा पुरावा आहे आणि एका अत्यंत गरीब, मागासलेल्या राज्यात हे घडलेले आहे. पूर्वी बिहार राज्याचा भाग असलेले आणि २००० साली अस्तित्वात आलेले झारखंड राज्य. २४ जिल्हे. प्रामुख्याने ग्रामीण आणि दुर्गम भाग. साडेतीन कोटींच्या आसपास लोकसंख्या. झारखंडचा अर्थ होतो वनांचा प्रदेश. भारताची ४० टक्के खनिज संपदा असलेल्या झारखंड राज्यात ४० टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली. आलमगीर आलम हे अशा राज्यातले ग्रामीण विकास मंत्री आहेत. त्यांच्या पीएचा घरगडी कोट्यवधींची रोख रक्कम सांभाळत होता. म्हणजे ती रक्कम त्याने घरात ठेवली होती. या राज्याचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना काही महिन्यांपूर्वीच ईडीने अटक केली. हेमंत सोरेन यांचे निकटवर्ती आणि झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते (टोपण नाव- झारखंड टायगर) चंपई सोरेन महाशय सध्या मुख्यमंत्रिपदाची खुर्ची सांभाळत आहेत. या मुक्ती मोर्चाची काँग्रेस आणि अन्य पक्षांशी आघाडी आहे. या अशा राज्यात विद्यमान ग्रामीण विकास मंत्री आलमगीर आलम हे पाकूड विधानसभा क्षेत्रातून चार वेळा काँग्रेसचे आमदार म्हणून निवडून आलेले नेते. यापूर्वी आलमगीर आलम २००६ ते २००९ पर्यंत झारखंड विधानसभेचे अध्यक्ष होते. ते काँग्रेसचे मोठे नेते आहेत. त्यामुळे काँग्रेसच्या नेत्यांना साजेसे व्यसन त्यांना आहे आणि ते म्हणजे जास्तीत जास्त रोख रक्कम जमा करणे. आता त्याला तशी पक्षाची मर्यादाही राहिलेली नाही. आजकाल तर राजकारणाशी थेट संबंध नसलेल्या पण सेटिंग किंवा मांडवलीत माहिर असलेल्या दलालांकडे आणि लुच्च्या हैवानांकडेदेखील कोट्यवधी रुपयांची रोकड ठेवलेली असते. त्यांची कमाई आणि त्यांचे आलिशान राहणीमान याचा परस्परसंबंध जोडणे अवघड असते. त्यामुळे ईडीने अशा प्रकरणांत अधिकाधिक खोल तपास केला पाहिजे. मंत्र्याच्या पीएच्या घरगड्याकडे ३३ कोटी असतील तर पीएकडे किती असतील, याचा विचार केला पाहिजे. पीएकडे ५०-६० किंवा १०० कोटी असतील तर आलमगीर आलम यांच्या नातेवाईकांकडे आणि त्यांच्या स्वतःकडे किती रोकड असेल, याची कल्पना करता येते. इवलेसे आणि गरीब राज्य आहे झारखंड. त्या राज्यातल्या एका मंत्र्याच्या पीएचा घरगडी ३०-३५ कोटी रुपयांत लोळत किंवा खेळत असेल तर तिथले लोक तेवढे गरीब आहेत आणि बाकीचे सरकारात असलेले सगळे श्रीमंत व सुखवस्तू आहेत, असा अर्थ काढता येतो. झारखंड हे राज्य फार पूर्वीपासून आर्थिक घोटाळ्यांसाठी प्रसिद्ध आहे. १९९३ मध्ये पी. व्ही. नरसिंहराव यांचे सरकार वाचवण्यासाठी झारखंड मुक्ती मोर्चाच्या खासदारांना लाच दिली गेली आणि ती त्यांनी स्वीकारली, हे सर्वांनाच ठाऊक आहे. त्यावेळी ते प्रकरण फार गाजले होते. एखादा प्रदेश जितका मागासलेला असतो, तितका अधिक वाव तेथे भ्रष्टाचाराला असतो. ज्या भागात भुकेचे प्रश्न तीव्र असतात, तिथे भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उचलणे वगैरे तर कविकल्पना असतात. झारखंडमधील काँग्रेसी पुढाऱ्यांनी, मंत्र्यांनी वर्षानुवर्षे त्याचाच फायदा घेतला. आलमगीर आलम यांच्या ग्रामीण विकास खात्यातील माजी मुख्य अभियंता वीरेंद्र कुमार राम यांच्याविरुद्ध मनी लॉण्ड्रिंगचे प्रकरण दाखल करण्यात आले आहे. त्यालाही आता वर्ष झाले. ईडीकडून त्याचाच तपास केला जात आहे. त्याच प्रकरणात त्यांच्या पीएच्या घरगड्याच्या घरात हे घबाड सापडले. या वीरेंद्र कुमार राम यांच्याकडे १०० कोटींहून अधिक किमतीची बेहिशेबी मालमत्ता आहे, असे म्हणतात. पण, या साऱ्या गोष्टींशी, त्या रकमेशी आपला संबंध नसल्याचा मानभावीपणा आलमगीर आलम यांनी सुरू केलेला आहे. अशातले काहीही अंगलट येत असेल तर ते झटकून टाकायचे, ही राजकीय पुढाऱ्यांची रीत असते. त्याला आलमगीर आलम अपवाद असण्याचे कारण नाही. त्यामुळे ते जे बोलले, ते त्यांच्या परंपरेला साजेसे म्हटले पाहिजे. ते काँग्रेसी कुळातील असल्यामुळे त्यांच्यासाठी अवैध पैसा जमा करण्यात वावगे काहीही नसते. याच झारखंडमध्ये गतवर्षीच्या डिसेंबर महिन्यातल्या घटनेचे कवित्व अजून ताजे आहे. काँग्रेसचे राज्यसभा सदस्य व 'बिझनेसमन' म्हणून ख्यातिप्राप्त असलेले खासदार धीरज साहू यांच्याशी संबंधित अनेक ठिकाणांवरून प्राप्तिकर विभागाने साडेतीनशे कोटी रुपयांची रोख रक्कम जप्त केली होती. धीरज साहू यांनी असे सांगितले होते की, ते साडेतीनशे कोटी रुपये माझ्या मद्य कंपन्यांचे आहेत. मद्याचा व्यवहार रोखीतच होतो. त्या रकमेशी काँग्रेसचा संबंध नाही. त्यावर तपास यंत्रणेने काय उत्तर दिले याची कल्पना नाही. पण, मद्याची वा अन्य कशाचीही कमाई असली, तरी ती अशी रोख स्वरूपात बाळगता येते काय, असा प्रश्न कुणालाही पडावा. आता त्याच मालिकेत आलमगीर आलमदेखील ३३ कोटींच्या रकमेशी आपला संबंध नसल्याचे सांगतात. त्याहून कहर बतावणी अशी की, हा जो संजीव लाल नावाचा आलमगीर आलम यांचा पीए आहे, तो यापूर्वी भाजपाच्या मंत्र्यांकडेदेखील होता, असे काँग्रेसवाले सांगू लागले आहेत. अर्थात, काहीही सांगितले तरी यातील गांभीर्य कमी होत नाही. कारण, काँग्रेस आणि भ्रष्टाचार हे समानार्थी शब्द आहेत, हे एव्हाना साऱ्या देशाला कळून चुकले आहे. भारतातील राजकीय भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये प्रमुख भूमिका नेहमीच काँग्रेसची असते. ती कालही होती, ती आजही आहे. काँग्रेसचे नाव भ्रष्टाचाराच्या घोटाळ्यांमुळे कलंकित झाले आहे. आदर्शवाद आणि वचनांनी गाजणाऱ्या स्वातंत्र्योत्तर युगात काँग्रेस पक्षाने देशाची सूत्रे सांभाळली. त्यानंतर केंद्रीय व अनेक राज्यांतील सत्ता प्रामुख्याने काँग्रेसच्याच ताब्यात राहिली. सत्ता माणसाला भ्रष्ट करते आणि निरंकुश सत्ता संपूर्णपणे भ्रष्ट करते, असे एक सुभाषित आहे. ते काँग्रेसला चपखल लागू पडते. काँग्रेसच्या पासंगालाही कोणता पक्ष पुरत नव्हता. त्यामुळे काँग्रेसची सत्ता तशी निरंकुश होती आणि त्यामुळे भ्रष्टाचारही अमर्याद. कुप्रसिद्ध जीप घोटाळ्यापासून ते बोफोर्स किकबॅकपर्यंत आणि पुढे स्पेक्ट्रम, कॉमनवेल्थ घोटाळ्यापर्यंत काँग्रेसचे नाव सतत कलंकित होत राहिले. भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आश्वासने देणाऱ्या काँग्रेसच्या राजवटी सातत्याने अपयशी ठरल्या. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) सरकारच्या काळात, धोरणात्मक निर्णयांवर आपपरभावाचे प्राबल्य असल्यामुळे सार्वजनिक संसाधने लुटली गेली आणि भ्रष्टाचाराचे वर्तुळ झपाट्याने विस्तारले. त्याने लोकशाहीच्या औचित्यावर अनेकदा प्रश्नचिन्ह निर्माण केले. लोकांच्या लोकशाहीवरील विश्वासाचे प्रश्न निर्माण केले. काँग्रेसची संपूर्ण देशात पीछेहाट झालेली आहे. पण, भ्रष्टाचार रक्तात मुरलेला असल्यामुळे अशी घबाडे ठेवण्याची बिशाद त्यांच्या पुढाऱ्यांमध्ये अजून आहे. आलमगीर आलम हे अशा आलमपनाह मंडळींपैकी एक. असे कितीतरी आलमगीर देशाच्या कानाकोपऱ्यात असतील. त्यांचा शोध घेतला आणि धाडी घालून रोखीच्या रकमा जप्त केल्या तर कदाचित महाराष्ट्रासारख्या राज्याचे अख्खे वर्षाचे बजेट त्यातून मार्गी लागू शकेल. एकीकडे आमच्याकडे निवडणुकीसाठी पैसा नाही. भाजपाने, मोदींनी आमची कोंडी केली आहे, असे काँग्रेसचे नेते राहुल गांधी म्हणतात आणि दुसरीकडे त्यांच्याच पक्षातले आलमपनाह अशा प्रकारे ३३ कोटी रुपयांची रोकड पीएच्या नोकराकडे ठेवतात. या विसंगतीचे उत्तर राहुल बाबांनी दिले पाहिजे. ते त्यांनी आज टाळले तरी कधी ना कधी ते त्यांना द्यावेच लागेल. ▮

## चिंतन

# व्होट जिहाद आणि...

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

आजकाल जगातील सर्वात जुनी लोकशाही अमेरिका आणि सर्वात मोठी लोकशाही भारतामध्ये जिहादचा प्रतिध्वनी आहे. संदर्भ आणि कारणे वेगवेगळी आहेत. अमेरिकेच्या संदर्भात माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणतात की, अमेरिकेत जिहादची गरज नाही. अमेरिकेत विद्यापीठांचे इस्लामीकरण होऊ नये. अशी काही विद्यापीठे आहेत ज्यांच्या आवारामध्ये युवा शक्ती गाझा पॅलेस्टिनींच्या बाजूने आंदोलन करीत आहे. ते हमाससारख्या दहशतवादी संघटनेचे समर्थक किंवा प्रतिनिधी असू शकतात. आश्चर्य वाटते की, गाझातील मुस्लिमांची स्थिती आणि इस्रायलच्या हल्ल्यांबाबत आता बहुतांश इस्लामिक देश मौन बाळगून आहेत, पण अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये मात्र हालचाली सुरू आहेत. माईकवर नमाज अदा केली जात आहे. तरुणांनी तर महाविद्यालयामध्ये तंबू ठोकून अडथळे उभारले आहेत. सुमारे २३०० विद्यार्थ्यांना अटक करावी लागली. ही अमेरिकन लोकशाहीची संस्कृती नाही. ही आंदोलने बंद व्हायला हवीत. जेव्हा युरोपने जिहादसाठी दरवाजे उघडले तेव्हा काय झाले ते आपण पाहिले आहे? पॅरिस, लंडनची उदाहरणं पहा, त्यांची मूळ ओळख आता पुसली गेली आहे. हे अमेरिकेत होऊ नये. आपल्याकडे अविश्वसनीय संस्कृती आणि परंपरा आहे. या हालचाली नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीचा मुख्य मुद्दा बनू शकतात. पण, अमेरिकेत जिहादचा प्रतिध्वनी का आहे?

भारतातही सध्या सार्वत्रिक निवडणुकांचा हंगाम आहे, पण त्यातही जिहादचा डोस मिसळला आहे. लोकसभेसाठी मतदानाचा टप्पा सुरू आहे; मात्र उत्तरप्रदेशातील समाजवादी पक्षाचा चेहरा असलेल्या मारिया आलम खान यांनी 'व्होट जिहाद'च्या माध्यमातून मुस्लिमांना आवाहन केले आहे. संपन्न आणि सुशिक्षित कुटुंबातील माजी केंद्रीय मंत्री सलमान खुर्शीद यांच्या त्या भाची आहेत. तरीही अशा जातीयवादी आणि देशद्रोही विचारसरणीची त्यांची हाक ऐकून आश्चर्य वाटले. मारिया या समाजवादी पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षा आहेत. निवडणुकीच्या एका सभेत त्या म्हणाल्या होत्या, ''मोठ्या बुद्धिमत्तेने भावनाविवश न होता शांतचित्ताने एकत्रित या. आपण फक्त मतांसाठी जिहाद करू शकतो आणि या सरकारला घालवण्याचे काम करू शकतो.'' जिहादच्या या आवाहनामुळे राजकारणात प्रचंड खळबळ उडाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनाही प्रत्युत्तर द्यावे लागले. मारिया यांनी सध्याच्या सरकारबद्दल वापरलेले शब्द अत्यंत घृणास्पद आणि आक्षेपार्ह आहेत. सलमान खुर्शीद यांनी मारियाचे, आपल्या भाचीचे जिहादचे वक्तव्य जाहीरपणे स्वीकारले नाही. मात्र, या कथित जिहादचा वास्तवाशी काहीही संबंध नसल्याचे ते म्हणाले. असा जिहाद आपल्या देशात मान्य नाही. वास्तविक प्रश्न असा आहे की, भारतात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी इ. फुटीरतावादी मार्गावरच निवडणुका होऊ शकतात का? परस्पर सौहार्द आणि बंधुभावाच्या भावनेने निवडणुका होऊ शकत नाहीत का? भारत घटनात्मकदृष्ट्या धर्मनिरपेक्ष देश आहे. जिहादबद्दल असे बोलणे ही गुन्हेगारी मानसिकता आहे. प्रत्येक मुस्लिमाने घराबाहेर पडून आपल्या निवडलेल्या मुस्लिम उमेदवाराच्या बाजूने मतदान करावे, अशी मारियासारख्या लोकांची इच्छा आहे.

निवडणुकीत हिंदू-मुस्लिम का असावेत? देशाच्या साधनसंपत्तीवर पहिला हक्क मुस्लिमांचाही हवा, सरकारी नोकऱ्या, शिक्षण, आरोग्य, सरकारी करार, क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्येही आरक्षण आवश्यक आहे. काँग्रेस २००९ पासून आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात असे आरक्षण किंवा समान संधी देण्याचे आश्वासन देत आहे. ते आधीही असाच विचार करत असतील. काँग्रेस, मे २०१४ पासून केंद्रीय सत्तेबाहेर आहे हे खरे आहे; पण मुस्लिम अल्पसंख्यकांचा वैयक्तिक कायदा, पेहराव, खाण्यापिण्याच्या सवयी आणि वर्तनाचे वर्चस्व याला पूर्ण स्वातंत्र्य देण्याचीही त्यांनी निश्चित घोषणा केली आहे. ते परत सत्तेत आल्यास संपूर्ण देशातही 'शरिया कायदा' लागू होणार का? मतदानाच्या नावावर जिहाद कसा चालवला जाईल, हे कोणीही स्पष्ट केलेले नाही. एकूणच काँग्रेसने 'व्होट जिहाद' नाकारलेला नाही. 'जिहाद' हा कोणत्या लोकशाहीचा भाग किंवा समानार्थी शब्द आहे? भारतात दहशतवादाच्या नावाखाली जिहाद सुरू असल्याचेही ऐकले आहे. देशाच्या विविध भागांत दहशतवादी हल्ले होत आहेत. जिहादच्या नावाखाली नरसंहार आणि रक्तपात झाला आहे. असेच चालू राहिल्यास याला 'धार्मिक युद्ध' कसे म्हणता येईल? मारियाविरुद्ध केवळ एफआयआर नोंदवणे पुरेसे नाही. देशविरोधी कारवायांसाठी त्यांच्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. उपरोधिक आणि दुर्दैवी गोष्ट ही आहे की, भारतात आपण कधी 'लव्ह जिहाद' ऐकतो तर कधी 'लॅण्ड जिहाद'च्या घोषणा दिल्या जातात. मुस्लिम आरक्षणावरही न्यायालयाच्या विरोधात जिहाद पुकारला जाऊ शकतो. अलिकडेच धर्माच्या आधारावर आरक्षण देता येत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, 'व्होट जिहाद' लोकशाहीच्या विरोधात आहे. अर्थात निवडणुकीच्यावेळी सर्व समाजाची चर्चा व्हायला पाहिजे, पण सुमारे २० कोटी लोकसंख्या असलेल्या मुस्लिम समाजाला जिहाद पुकारण्यास फूस लावणे 'असंवैधानिक' आहे. त्यांना चिथावणी देण्याचे राजकारण भारतात कमी-अधिक प्रमाणात सुरू आहे आणि हा अस्वीकार्य आणि दंडनीय गुन्हा आहे.

संविधान आणि आरक्षणाच्या या चर्चेला भाजपा खासदार अनंत हेगडे आणि लल्लू सिंह यांच्या विधानांनी सुरुवात झाली की, ४०० च्या पुढे घोषणेचे लक्ष्य काय? त्या आधारे संसदेत पुरेशा बहुमताने संविधान बदलता यावे आणि आरक्षणही रद्द करता यावे यासाठी पंतप्रधान मोदी आणि भाजपा-मित्रपक्ष जागांची मागणी करीत असल्याचा आरोप काँग्रेसने सुरू केला. भाजपा-संघाची मूळ विचारसरणीच आरक्षणविरोधी असल्याचा आरोप काँग्रेस करीत आहे. त्यांचा हा विश्वास म्हणजे स्वतःच एक मिथक आहे. दुसरीकडे मागासवर्गीय आरक्षणाच्या नावाखाली काँग्रेसच्या कर्नाटक सरकारने मुस्लिमांना 'मागास' घोषित करून त्यांना आरक्षण दिल्याचा आरोप पंतप्रधान मोदी आणि भाजपाच्या प्रचारक नेत्यांनी केला आहे. ओबीसी कोट्यातील मुसलमानांना ४ टक्के आरक्षण हे घटनाबाह्य आहे. निवडणुकीनंतर स्थापन होणारे मोदी सरकार याप्रकरणी योग्य ती कारवाई करेल, असे गृहमंत्री अमित शाह यांनी जाहीरपणे स्पष्ट केले आहे. अलिगड मुस्लिम विद्यापीठ आणि जामिया मिलिया विद्यापीठात दलित, आदिवासी आणि ओबीसींना आरक्षण का दिले जात नाही, याबाबतही सरकार घटनात्मक कारवाई करणार आहे. पंतप्रधानांनाही संविधान आणि आरक्षणाच्या मुद्यांवर आक्रमकपणे उत्तरे द्यावी लागत आहेत, त्यामुळे पहिल्या टप्प्यातील मतदानानंतर त्यांनी आपला सूर, भाषा आणि दृष्टिकोन बदलला आहे. १० वर्षांच्या कार्यकाळात पंतप्रधान मोदी अनेकदा विकास आणि पाचव्या क्रमांकापासून ते तिसऱ्या क्रमांकापर्यंत जागतिक अर्थव्यवस्थेबद्दल आणि 'विकसित भारत'बद्दल बोलले आहेत. यावेळीही त्यांनी 'विकसित भारत'चा संकल्प साध्य करण्यासाठी रोडमॅप तयार करण्याच्या आदेशाची मागणी केली आहे. काँग्रेस आणि राहुल यांच्या कारवायांवर पंतप्रधानांनी अधिक भाष्य करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, अनुभवाच्या आधारे मोदी तिसऱ्यांदाही पंतप्रधान होतील, असा अंदाज आहे. अर्थात ४०० चा आकडा हा गौण मुद्दा ठरेल. उत्तरप्रदेश, राजस्थान, हरयाणा इत्यादी हिंदी भाषी राज्यांमध्ये जनादेशाचे आकडे कमी असू शकतात, परंतु इतर राज्यांचे आश्चर्यकारक असतील. संसदेत आजवर १०० हून अधिक दुरुस्त्या मंजूर झाल्या असल्या, तरी ७४ वर्षांनंतरही संविधान धर्मनिरपेक्ष आहे आणि राहील. आरक्षणाबाबत घटनापीठाचा निर्णय आहे, ज्याचे कोणतेही सरकार उल्लंघन करू शकत नाही. ▮

९९८७७४६७७६

## वेध

**गिरीश शेरेकर**

# 'डीपफेक' समाजमाध्यमांना लागलेली कीड

डीपफेक म्हणजे मूळ व्हिडीओ, ऑडिओ आणि फोटोमध्ये छेडछाड करून असत्य संदर्भ त्यात जोडून ते प्रसारित करणे. हा बनावटपणा सर्रासपणे सुरू असून सर्वत्र व्हायरल केला जातो. देशात सध्या निवडणुका सुरू असल्याने डीपफेकचे प्रमाण वाढले आहे. अनेक राजकीय नेते, अभिनेते, अभिनेत्री, उद्योगपती व अनेक मान्यवर मंडळी डीपफेकचे बळी पडले आहेत. खुद्द पंतप्रधान मोदी यांनी यावर जाहीरपणे चिंता व्यक्त केली होती. डीपफेकचे वाढते प्रकार पाहून असे लक्षात येते की, समाजमाध्यमांना लागलेली ही कीड आहे. ती समूळ नष्ट करणे अत्यावश्यक झाले आहे. कारण, डीपफेकने जनतेत गैरसमज निर्माण होतात. समाजव्यवस्थेवर त्याचा परिणाम होतो. आपल्या मोबाईलवर जे आले आणि पाहिले तेच खरे आहे, अशी भावना अनेकांची असते. कोणतीही खातरजमा करण्याची तसदी अनेक मंडळी घेतच नसल्याने चुकीचा संदेश प्रसारित होत राहतो. अशीच एक घटना नुकतीच घडली. गृहमंत्री अमित शाह तेलंगणा येथील जाहीर सभेत आरक्षणावर बोलले. लगेच त्या भाषणाच्या व्हिडीओमध्ये छेडछाड करून चुकीच्या शब्दांचा वापर करत डीपफेक व्हिडीओ तयार करण्यात आला. तो मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यावर गोंधळ उडाला. तपासणीनंतर लक्षात आले की, अमित शाह बोलले वेगळेच आणि व्हिडीओ व्हायरल झाला भलताच! असे अनेक व्हिडीओ वेगवेगळ्या व्यक्तींचे दररोज तयार होतात. त्याने संभ्रम निर्माण होतो.

गृहमंत्रालयाने या घटनेची गंभीर दखल घेऊन दिल्ली पोलिसांना तपासाचे आदेश दिले होते. काँग्रेस नेता अरुण रेड्डी यांनी अमित शाह यांचा डीपफेक व्हिडीओ तयार करून व्हायरल केल्याचे समोर आले. या प्रकरणी आतापर्यंत ७ राज्यातल्या १६ जणांना समन्स देण्यात आले आहे. विशेष म्हणजे त्यात काँग्रेसचे तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांचाही समावेश आहे. या सर्वांनी डीपफेक व्हिडीओ व्हायरल केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. एकंदरीतच हा सर्व प्रकार गंभीर आहे. दिल्ली उच्च न्यायालयात डीपफेकचे प्रकरण गेले आहे. वकिलाच्या एका संघटनेने ही याचिका दाखल केली आहे. यावर सुनावणी करत न्यायालयाने नेत्यांच्या डीपफेक व्हिडीओवर निवडणूक आयोगाने कारवाई करावी, असे निर्देश दिले आहेत. हा तात्पुरता उपाय झाला. यावर ठोस उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे. दिवसेंदिवस डीपफेकचे प्रकार वाढत आहेत. महाराष्ट्र सरकारने डीपफेक व्हिडीओ, ऑडिओ, फोटो तयार करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश राज्य पोलिसांना दिले आहेत. बॉलिवूडच्या अनेक अभिनेत्री डीपफेकने अनेकदा त्रस्त झाल्या आहेत. ते सहजासहजी ओळखता येत नाही. त्यामुळेच अनेकांचा त्यावर विश्वास बसतो. तपास यंत्रणेसाठी हा चिंतेचा विषय आहे.

डीपफेक व्हिडीओ, ऑडिओ, फोटो आर्टिफिशियल इंटेलिजेंसच्या मदतीने तयार केले जातात. वेगवेगळे प्रकार त्यात आहेत. त्यामध्ये एखाद्या व्यक्तीचा चेहरा दुसऱ्या व्यक्तीच्या चेहऱ्यामध्ये बदलला जाऊ शकतो. ऑडिओ क्लोनिंगदेखील केले जाऊ शकते. व्यक्तीचा आवाज क्लोन करून म्हणजेच त्या व्यक्तीचा आवाज वापरून अशा गोष्टी बोलायला लावल्या जातात; ज्या त्याने कधीच बोलल्या नाहीत. एवढेच नव्हे, तर मृत्यू झालेल्या व्यक्तीचा चेहरा वापरूनही डीपफेक तयार केले जाऊ शकतात.

डीपफेकचा वापर करणारा डिकोडर सर्वप्रथम व्यक्तीच्या चेहऱ्याचे हावभाव, तो कसा दिसतो याचा सखोल अभ्यास करतो. त्यानंतर एखाद्या बनावट चेहऱ्यावर दुसऱ्या व्यक्तीचा चेहरा लावला जातो. पहिले डीपफेक व्हिडीओ तयार करणे कठीण काम होते. पण, आता डीपफेकसंदर्भातील वेगवेगळे ॲप उपलब्ध आहेत. त्याने सहज डीपफेक व्हिडीओ तयार केले जाऊ शकतात. डीपफेकचे प्रमाण वाढल्याने आपल्यापुढे आलेल्या व्हिडीओवर विश्वास ठेवण्यापूर्वी त्याची खातरजमा करायला हवी. आलेला व्हिडीओ किंवा ऑडिओ इतरत्र तसाच आहे का, हे पडताळून पाहायला हवे. बारकाईने निरीक्षण केल्यास डीपफेकमधील चुका सहज ओळखता येतात. त्यात प्रामुख्याने कान, नाक व्यवस्थित न दिसणे, डोळ्यांच्या पापण्या, भुवयांच्या आकारात तफावत इत्यादी. डीपफेक व्हिडीओ झूम करून पाहिल्यास त्यामध्ये बोलत असलेल्या व्यक्तीचे हावभाव व ओठांच्या हालचालीवरून तुम्हाला कळू शकते, तो व्हिडीओ बनावट आहे की खरा. थोडे तंत्रज्ञान अवगत असलेला व्यक्ती हे तपासू शकतो, पण शहरी व ग्रामीण भागातल्या अनेकांना ते ज्ञान नसते. असे व्हिडीओ, ऑडिओ, फोटो तयारच होऊ नये आणि झाले तर प्रसारित होताच यंत्रणेच्या रडारवर यावे, संबंधिताला शिक्षा होईल, अशी व्यवस्था उभी केल्यावरच डोकेदुखी ठरलेला हा विषय थांबू शकतो. ▮

९४२०७२१२२५

## प्रासंगिक

# संविधान बदलणे अशक्य

**ॲड. धर्मपाल मेश्राम**

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये एकीकडे भारतीय जनता पक्ष विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी विकासाची गॅरंटी देत आहे तर दुसरीकडे विकासाचे कुठलेही धोरण नसलेले विरोधक विशेषतः काँग्रेस 'संविधान खतरे में हैं...'ची बतावणी करीत विशिष्ट जनसमुदायाला अस्वस्थ करून, संभ्रमातून मत लाटण्याच्या प्रयत्नात आहे. काँग्रेस पक्ष आणि महाविकास आघाडीतील साथीदारांकडून संविधानाबद्दल होणारा अपप्रचार खोटारडा आहे. मुळात संविधान बदलणे हे कोणालाही शक्य नाही. केशवानंद भारती आणि गोलकनाथ या दोन्ही खटल्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या सात सदस्यीय खंडपीठाने संविधानाची मूळ चौकट बदलता येणार नाही, असा निकाल दिला आहे. राजकीयदृष्ट्या भारतीय जनता पार्टीसमोर हतबल झाल्यानंतर काँग्रेस आणि त्याच्या मित्रपक्षांनी खोट्या नॅरेटिव्हचा आधार घेतला आहे.

भाजपाने 'अब की बार ४०० पार'चा नारा दिला आहे. भारताचे संविधान बदलण्यासाठीच भाजपाला ४०० जागा हव्या आहेत, असा अपप्रचार काँग्रेसकडून केला जात आहे. संसदेत कितीही बहुमत असले, तरी संविधानाचा मूळ गाभा कुणीही बदलू शकत नाही, हे संविधानाबद्दलचे सामान्य ज्ञान काँग्रेसला नाही. काँग्रेस पक्षाने सत्तेत असताना आतापर्यंत ७९ वेळा संविधानात दुरुस्त्या केलेल्या आहेत. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांत जेवढ्या वेळा काँग्रेस आणि काँग्रेसच्या नेतृत्वातील सरकारे आली, त्यांनी तेवढ्या वेळा संविधानाचे लचके तोडले. काँग्रेसने दुरुस्तीच्या नावाखाली संविधानाच्या मूलभूत तत्त्वाला, गाभ्याला, आत्म्यालाच धक्का पोहोचविला आहे. तरीही काँग्रेस संविधानाच्या संदर्भात भाजपाच्या विरोधात खोटारडा प्रचार करत आहे. ज्याचा संविधानाचा थोडा जरी अभ्यास असेल त्याला हे समजेल की, संविधान निर्मात्यांनी काळानुसार घटनादुरुस्तीची (अमेंडमेंट) करण्याची परवानगी दिली असली, तरी संविधान मुळापासून बदलण्याची परवानगी दिलेली नाही. सर्वोच्च न्यायालयानेही हा मुद्दा निकालात स्पष्ट केला आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल हा कायद्यासारखा असतो व तो बंधनकारक असतो, हे सामान्य ज्ञान तरी काँग्रेसवाल्यांना आहे की नाही, याची मला शंका वाटते. या देशामध्ये संवैधानिक व्यवस्था कुणी हलवू शकणार नाही, कितीही बहुमत असले, तरी



संविधानाच्या गाभ्याला हात लावला जाऊ शकत नाही. कारण संवैधानिक व्यवस्थेमध्ये तशा कोणत्याही पद्धतीची तरतूद नाही, हे अनेकदा सिद्ध झाले आहे.

देशाची संवैधानिक व्यवस्था कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका या तीन खांबांवर आहे. कायदे करणारी संस्था असली, तरीदेखील ती सर्वोच्च नाही. संसदेने किंवा विधिमंडळाने केलेल्या कायद्यांचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी ४२ व्या घटनादुरुस्तीने संविधानाच्या प्रास्ताविकेमध्येदेखील दुरुस्ती केली. केवळ प्रास्ताविकेमध्येच दुरुस्ती केली असं नाही, तर मूळ गाभ्यालादेखील हात लावण्याचा प्रयत्न केला. एवढेच नाही, तर कोणत्याही न्यायालयाला 'कॉन्स्टिट्यूशनल अमेंडमेंटला रिव्ह्यू' करण्याचे अधिकार नाहीत, अशा पद्धतीचीही तरतूद केली. काँग्रेसने त्यांच्या सत्तेच्या ५०-५५ वर्षांच्या कार्यकाळात काय कामे केली, काय निर्णय घेतले, कोणत्या पद्धतीचा विकास साधला, कोणत्या पद्धतीची व्यवस्था निर्माण केली आहे, त्याबद्दल बोलायला पाहिजे. भाजपाने काही चुकीचे केले असेल तर ते अधोरेखित करीत आपली बाजू मांडून पुढे जाणे अपेक्षित होते. संविधानाच्या संवेदनशील मुद्यावर खोटा प्रचार करून एका मोठ्या वर्गाच्या भावना भडकवून राजकीय फायदा करून घेण्याचा प्रयत्न आज विरोधी पक्ष करीत आहे.

भारतीय जनता पक्षाने आणि पक्षाशी निगडित कुठल्याही संघटनेने कधीच संविधानविरोधी कृत्य केले नाही. भाजपाने मागील १० वर्षांत संविधानात कोणत्या दुरुस्त्या केल्या आणि त्या कशासंदर्भात केल्या, हे सर्व जनतेसमोर आहे. भाजपाद्वारे करण्यात आलेल्या या दुरुस्त्यांचा अभ्यास करावा, पण त्यासोबत काँग्रेसच्या कार्यकाळात जवळपास ७९ घटनादुरुस्त्या करण्यात आल्या; त्या नेमक्या कोणत्या होत्या, त्याचादेखील अभ्यास करण्याची गरज आहे. यामुळे दोन्ही सरकारांच्या कार्यकाळांच्या तुलनात्मक अभ्यासामुळे सत्य पुढे येईल. संविधान बदलणार नाही याची गॅरंटी भाजपा देतो. कोणत्याही प्रकारे संविधानाच्या मूलभूत गाभ्याशी कोणत्याही पद्धतीची छेडछाड आज, उद्या किंवा येणाऱ्या काळात कुणीही करू शकणार नाही. भाजपा असे कृत्य कधीच करू शकणार नाही. कारण आमच्या नेतृत्वावर आमचा विश्वास आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २०४७ पर्यंत विकसित भारताचा निर्धार केला आहे. विकसित भारत हे प्रत्येक सर्वसामान्य माणसाचे स्वप्न आहे. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारतीय जनता पक्षाला संख्याबळ पाहिजे. भाजपाने मागच्या १० वर्षांत देशातल्या सर्वसामान्य लोकांसाठी काम केले आहे. समाजाभिमुख, लोकाभिमुख विकासाची कामे केलेली आहेत. अनेक महत्त्वाच्या सुधारणा केलेल्या आहेत. घटनेच्या ३७० व्या कलमामुळे जम्मू-काश्मीरला स्वतंत्र दर्जा मिळाला होता व त्याचे स्वतंत्र संविधान होते. 'इस देश मे दो निशान, दो प्रधान, दो विधान नही चलेंगे' असे म्हणत डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी बलिदान दिले. 'विधान' म्हणजे संविधान. बाबासाहेबांनी दिलेले देशाचे संविधान ३७० कलमामुळे जम्मू-काश्मीरमध्ये पूर्णपणे लागू होत नव्हते. मोदी सरकारने ३७० कलम हटविल्यामुळे आज संपूर्ण देशामध्ये देशाचे संविधान पूर्णपणे लागू झाले आहे.

काँग्रेसच्या नेत्यांनी या देशातल्या दलितांना व मुस्लिमांना आपल्या स्वार्थासाठी वेठीस धरले आणि देशाला विकासापासून वंचित ठेवले. त्या नेत्यांवर विश्वास ठेवण्याची निश्चितच वेळ नाही. त्यामुळे आज भारतीय जनता पक्ष देशभरातील जनतेला आवाहन करीत आहे की, अशा प्रलोभनांना किंवा अशा चुकीच्या समजांना रूढ करण्याचे राजकारण करीत असलेल्यांच्या विषयांना बळी पडू नये. जे सुज्ञ, शिक्षित आहेत अशा सर्व लोकांनी प्रत्येक गोष्टीचा अभ्यास करून निष्कर्ष काढावा. देशाचे संविधान कोणीही बदलू शकत नाही. या पवित्र संविधानाच्या आधारे विकसित भारत निर्माण करण्यासाठी सर्वजण सोबत काम करू या... ▮

९४२२४४०६०२

(लेखक हे भारतीय जनता पार्टीचे प्रवक्ता व महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आहेत.)

## अक्षय्य तृतीयेचा शुभ मुहूर्त!

ज्योतिषांच्या मते, यावर्षी अक्षय्य तृतीया शुक्रवार १० मे रोजी आहे. या दिवशी, शुभ मुहूर्त सकाळी ०४.१७ वाजता सुरू होईल आणि ११ मे रोजी पहाटे ०२.५० वाजता समाप्त होईल. त्यामुळे यंदा १० मे रोजी अक्षय्य तृतीया साजरी होणार आहे. गृहप्रवेश व इतर शुभ कार्य पूजेचा शुभ मुहूर्त सकाळी ०५.३३ ते दुपारी १२.१८ पर्यंत आहे. या काळात संपत्तीची देवता लक्ष्मीची प्रार्थना करू शकता आणि सुख, समृद्धी आणि संपत्तीत वाढ करण्याची कामना करू शकता. या काळात केलेली सर्व कामे यशस्वी होतात, असे मानले जाते. तसेच संपत्तीत वाढ होते. वैशाख शुद्ध तृतीया म्हणजेच हिंदू संस्कृतीचा अती महत्त्वाचा सण अक्षय (अक्षय्य) तृतीया. ज्याचा कधीही क्षय होत नाही, असा हा अक्षय सण दिवस. अक्षय्य तृतीया हा दिवस एकूण साडेतीन मुहूर्तांपैकी एक पूर्ण शुभ मुहूर्त दिन आहे. भारतीय शास्त्रसंमत असे आहेत साडेतीन शुभ मुहूर्त १) दसरा विजया दशमी आश्विन शु. दशमी, २) गुढीपाडवा चैत्र शु. प्रतिपदा, ३) अक्षय्य तृतीया वैशाख शु. तृतीया आणि अर्धादिवस म्हणजे शुभमुहूर्त दिवाळी पाडवा कार्तिक शु. प्रतिपदा म्हणजेच बलिप्रतिपदा.

विशेष म्हणजे अक्षय्य तृतीया या शुभ तिथीलाच त्रेतायुगाचा प्रारंभ झाला तसेच हयग्रीव अवतरण, नरनारायण प्रकटीकरण याच तिथीला झालेले होते. भगवान विष्णूचा सहावा अवतार भार्गववंशीय ऋषी जमदग्नी व माता रेणुका यांचा पुत्र परशुराम देवाचे अवतरण याच शुभ मुहूर्तावर झालेले आहे. भगवान परशुराम चिरंजीवी आहेत. अक्षय्य तृतीयेदिवशी ब्रह्मांडात अखंड रूपातील तसेच एकसमान गतिजन्यता दर्शवणाऱ्या सत्व-रज लहरींचा प्रभाव अधिक प्रमाणात असतो. या लहरींच्या प्रवाहायोगे पितर आणि देव यांना उद्देशून ब्राह्मणाला केलेले दान पुण्यदायी आणि गतजन्माच्या हिशोबाला धरून कर्म-अकर्म करणारे ठरत असतात. म्हणूनच या कधीही क्षय न होणाऱ्या लहरींच्या प्रभावाच्या साहाय्याने केलेले दान हे पुण्यलाभप्रद ठरते.

*अस्यां तिथौ क्षयमुपैति हुतं न दत्त*
*तेनाक्षयेति कथिता मुनिभिस्तृतीया।*
*लउद्दिश्य दैवतपितंक्रियते मनुष्यैः*
*तच्चाक्षयं भवति भारत सर्वमेया। (मदनरत्न)*

अर्थात : भगवान श्रीकृष्ण म्हणतात, हे युधिष्ठिरा, या तिथीला केलेले दान आणि हवन क्षयाला जात नाही म्हणून या तिथीला ऋषी-मुनींनी 'अक्षय्य तृतीया' असे म्हटले आहे. देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते, ते सर्व निश्चित अक्षय (अविनाशी) होते.

**किशोर पोहेकर**/नागपूर

## वाचक पत्रे

## खा. पूनम महाजनविषयी...

भाजपाचे एकेकाळचे तरुण, तडफदार व प्रभावी वक्ते व निष्ठावान नेते प्रमोद महाजन यांच्या पूनम महाजन कन्या होत. प्रमोद यांच्या पावलावर पाऊल ठेवून त्या राजकारणात उतरल्या आणि भाजपा महिला नेत्या म्हणून नावारूपास आल्या. सलग दोन वेळा त्या उत्तर मध्य मुंबईतून खासदार म्हणून निवडून आल्या आहेत. पण यावेळी त्यांना तिसऱ्या वेळेस उमेदवारी नाकारण्यात आली आहे.

त्यांच्याऐवजी प्रख्यात कायदे तज्ज्ञ ॲड. उज्ज्वल निकम यांना नव्याने भाजपात प्रवेश देऊन तेथे उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळेच पूनम महाजन यांना उमेदवारी नाकारल्याची चर्चाही सुरू झाली आहे. याची कुजबुज ही ऐकावयास येते आहे. भाजपाच्या एक निष्ठावान म्हणून त्यानी महिला आघाडीचे अध्यक्षपदही भूषविले आहे. त्या वडिलांप्रमाणे तडफदार नव्हे तर सालस-शांत प्रवृत्तीच्या म्हणून ओळखल्या जातात. त्यामुळेच त्या वक्तृत्वानिशी देशव्यापी नेत्या म्हणून तसेच चित्राताईंसारख्या वाघीण म्हणून महाराष्ट्रात फारशा चमकल्या नाहीत. खासदार या नात्यानेसुद्धा त्या मतदार संघातले काही महत्त्वाचे प्रश्न सोडवण्यात यशस्वी होऊ शकल्या नाहीत, असे बोलले जाते असल्यामुळेच की काय त्यांचे यावेळी तिकीट कापण्यात आले असावे आणि त्यांच्याऐवजी सक्षम व प्रभावी उमेदवार म्हणून ॲड. उज्ज्वल निकम यांना उमेदवारी बहाल करण्यात आली असावी.

**माधव पाटील**/९९२२०३८००५

## १०० टक्के मतदान करावे

ऊन, थंडी, वारा, पाऊस, कौटुंबिक सहली अशा आणि अन्य कोणत्याही कारणांनी मतदान न करणाऱ्यांनी, सीमेवर अकल्पनीय वातावरणात जीवाची पर्वा न करता, जागता पहारा देऊन, देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या सैनिकांच्या देशसेवेची तसेच देशांतर्गत सुरक्षेसाठी सदैव सज्ज असलेल्या पोलिस आणि अन्य सुरक्षा दलांची आठवण करावी. मतदान करणे हे प्रत्येक नागरिकाचे घटनादत्त कर्तव्य आणि मूलभूत अधिकार आहे. पाच वर्षांतून एकदाच येणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी, किमान एक तरी दिवस, सर्व समस्यांवर मात करून, कोणत्याही अपप्रचाराला, आमिषाला, स्वार्थाला, दहशतीला आणि अन्य कोणत्याही कारणाला बळी न पडता, केवळ राष्ट्र सर्वोपरी मानून १०० टक्के मतदारांनी सद्सद्विवेक बुद्धीचा वापर करून जबाबदारीने मतदानाचे पवित्र कर्तव्य पार पाडावे. ▮

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८४७२६८

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No 46878/87

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पोलिसांचे आरोपींना जशास तसे उत्तर

# गोळीबार करुन लुट करणाऱ्या आरोपीवर गोळीबार करुन अटक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ८ मे -**

अष्टविनायक नगरातील सेवानिवृत्त कर्मचारी रविंद्र रामचंद्र जोशी यांच्यावर गोळीबार करुन चाळीस हजार रुपये रोख व मोबाईल लुटून नेल्याची घटना काल सायंकाळी घडली होती. यातील आरोपींना पोलिसांनी पकडले असून, पळून जाणाऱ्या एका आरोपीवर पोलिसांनी गोळीबार केल्याने तो जखमी झाला आहे. यातील तिन्ही आरोपी जेरबंद करण्यात आले आहेत.पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी आज पत्रकार परिषदेत हि माहिती दिली.

मंगळवारी सायंकाळी अष्टविनायक नगर परिसरात स्टेट बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी रविंद्र रामचंद्र जोशी हे बँकेतून पैसे काढून घरी परत जात होते. त्यावेळी दोघांनी त्यांची बॅग लुटून त्यातील चाळीस हजार रुपये व त्यांच्या हातातील मोबाईल पळवून नेला होता. यावेळी जोशी यांनी या चोरट्यांचा सामना करत एकाला खाले पाडले. मात्र चोरटे पसार झाले.



घटनेची माहिती कळताच विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. शशिकांत महावरकर, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय व त्यांचे सहकारी घटनास्थळी पोहंचले. पाहणी केल्यानंतर व सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर पोलिसांनी दोन वेगवेगळी पथके निर्माण केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, सहायक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे व त्यांचे सहकारी असदवन भागात गेले. फिर्यादी जोशी यांची रेकी करणाऱ्या हरदिपसिंघ ढिल्लो याला पोलिसांनी पाठलाग करुन ताब्यात घेतले. ढिल्लोने मुख्य दोन आरोपींचा पत्ता सांगितला व धिल्लोला घेवून पोलीस एका धाब्यावर पोहंचले. तेंव्हा दोन आरोपीपैकी एकाने पोलिसांच्या पथकावर गोळी झाडली. त्याच्या प्रतिउत्तरात पोलिसांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. आरोपी सरप्रितसिंघ उर्फ साजन दलबिरसिंघ सहोता (२४) रा.पंजाब यास गोळी लागल्याने त्याला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यानंतर पोलिसांनी रोहित सतपाल कोडा रा.बरीवाला जि.मुक्तसर साहिब (पंजाब) यास अटक केली. त्यांच्याकडून पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेली ॲक्टीव्हा गाडी तसेच एक कार, गुन्ह्यात वापरलेली पिस्टल व चाकू, नगदी रोख रक्कम चाळीस हजार असा ४ लाख १५ हजार ५०० रुपयांचा ऐवज पोलिसांनी जप्त केला आहे. पैकी सरप्रितसिंघ सहोता व रोहित सतपाल कोडा यास भाग्यनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोळीबार केल्याप्रकरणी वेगळा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेकी करणारा व याबाबत टिप देणारा हरदिपसिंघ ढिल्लो हा हॉटेल व्यावसायिक असून, तो दशमेशनगर भागातील रहिवाशी आहे.

दुपारी घडलेल्या गोळीबार प्रकरणात पोलिसांनी तातडीने हालचाली करुन केवळ बारा तासात आरोपीला अटक केल्याचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

## जल वाहिनी दुरुस्ती करून पाणी पुरवठा तात्काळ सुरळीत करा : आ. मोहन हंबर्डे



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, ८ मे -**

नांदेड शहरास पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या विष्णुपूरी प्रकल्पावरील कोटीतीर्थ पंप हाऊसमध्ये झालेल्या बिघाडीमुळे संपूर्ण शहरवासीयांना गेल्या दहा दिवसांपासून निर्जळीला सामोरे जावे लागत आहे. भीषण पाणीटंचाईला जनता वैतागली असून तांत्रिक बिघाड तात्काळ दुरुस्त करून पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशा सक्त सूचना नांदेड दक्षिणचे आमदार मोहन हंबर्डे यांनी मनपा अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. दुरुस्तीचे काम दहा दिवस लोटले तरी पूर्ण न झाल्याबद्दल आमदार हंबर्डे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

नांदेड शहरास पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या विष्णुपूरी प्रकल्पावरील कोटीतीर्थ पंप हाऊस येथे १ मे च्या मध्यरात्री विद्युत मोटारीत तांत्रिक बिघाड झाल्यामुळे धरणातून होणारा पाणीपुरवठा बंद झालेला आहे. त्यामुळे नांदेड शहरातील झोन क्रं.०१ तरोडा (बु.), तरोडा (खु.), सांगवी, झोन क्रं.०२-अशोकनगर भाग, ०३-शिवाजीनगर भाग, झोन क्रं.०४-वजीराबाद भाग तसेच झोन क्रं.०५ मधील देगलुरनाका भागातील पाणीपुरवठा गेल्या दहा दिवसापासून बंद आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे पाण्याअभावी नागरिक त्रस्त असून पंप हाऊस मधील तांत्रिक बिघाड दुरुस्तीसाठी महापालिकेच्यावतीने होत असलेल्या दिरंगाईबद्दलही जनतेत संताप व्यक्त केला जात आहे. ही बाब लक्षात घेऊन नांदेड दक्षिणचे आमदार मोहन हंबर्डे यांनी बुधवारी दुरुस्तीच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून माहिती घेतली. तसेच उपस्थित मनपा अधिकाऱ्यांशी चर्चाही केली. दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर करून जनतेला होत असलेला त्रास दूर करावा, अशा सूचना आमदार हंबर्डे यांनी यावेळी दिल्या. पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यासाठी महापालिकेच्या वतीने सुरू करण्यात आलेली टँकरची व्यवस्थाही अत्यंत कुचकामी ठरत आहे शहरातील अनेक भागात अद्याप टँकर पोहोचले नसल्यामुळे भर उन्हात नागरिक पाण्यासाठी वणवण भटकत आहेत. शहराचे तापमान ४४ अंशावर पोहोचलेले असताना जनतेला पाण्यासाठी भटकंती करावी लागते याबाबत त्यांनी खेद व्यक्त केला. ही बाब अत्यंत गांभीर्याने घेत आमदार मोहन हंबर्डे यांनी मनपा अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले. सुरुवातीला दुरुस्ती अवघ्या चार दिवसात होईल व चार दिवसानंतर पाणीपुरवठा सुरू केला जाईल असे शहरवासीयांना सांगितले असताना दहा दिवसानंतरही पंप हाऊस मधील तांत्रिक बिघाड दुरुस्त का झाली नाही ? जनतेने आणखी किती दिवस प्रतीक्षा करायची?असा सवालही त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना केला.

दरम्यान पंप हाऊस दुरुस्तीचे काम युद्ध पातळीवर सुरू असून लवकरच नागरिकांना पाणीपुरवठा सुरळीत केला जाईल असे आश्वासन मनपा अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांनी आमदार मोहन हंबर्डे यांना दिले. यावेळी अभियंता सुमित पाटील, जकीउल्ला खान ,कार्यकारी अभियंता गोकुळे यांच्यासह मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# पाणी टंचाईचा फायदा घेत वॉटर फिल्टर चालकांकडून पाण्याच्या दरात वाढ

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ८ मे -**

शहरात मागील काही दिवसापासून पाणी पुरवठा बंद असल्याचा फायदा घेत शहरातील काही वॉटर फिल्टर चालकांनी पाण्याच्या दरात स्वंयघोषीत वाढ केल्याचे चित्र सध्या नांदेडमध्ये दिसत आहे. तर शहरातील बहुतांश वॉटर फिल्टर अनाधिकृतपणे चालतात हे विशेष.



नांदेड शहरातील उत्तर भागात मागील आठ दिवसापासून पाणी पुरवठा बंद होता. काही प्रमाणात टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला. टँकरने वापरासाठी पाणीपुरवठा होत असला तरी शहरातील बहुतांश कुटूंब वॉटर फिल्टरच्या पाण्याचा पिण्यासाठी वापर करतात. त्यामुळे पाणी पुरवठा बंदचा फायदा घेत अनेक वॉटर फिल्टर चालकांनी पाण्याच्या दरात स्वंयघोषीत वाढ केली. १० रुपायास मिळणारे साध्या पाण्याचे जार २० रुपये तर २० रुपयांत मिळणारे थंड पाणी ३० रुपयांत विक्री करण्यात येत आहे.

विशेष म्हणजे शहरातील बहुतांश वॉटर फिल्टर हे विनापरवानगी सुरु आहेत. गल्ली-बोळात, घरा-घरांत वॉटर फिल्टरची दुकाने थाटण्यात आली आहेत. हे पाणी शुद्ध आहे की नाही याची तपासणी देखील करण्यात येत नाही. तत्कालीन आयुक्त सुशील खोडवेकर यांनी अनाधिकृत वॉटर फिल्टर विरोधात कारवाई सत्र सुरु केले होते. त्यावेळी अनाधिकृतपणे सुरु असलेले अनेक वॉटर फिल्टर बंद करण्यात आले. परंतु त्यानंतर मात्र या अनाधिकृत वॉटर फिल्टरवर कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे मनपाने शहरातील सर्व वॉटर फिल्टरची तपासणी करण्याची गरज असल्याची चर्चा सुरु आहे.

## संक्षिप्त वृत्त



### वधु-वरास संविधान भेट

**अर्धापूर -** भाग्यश्री टेकाळे आणि अविनाश राजेगोरे यांचा विवाह सोहळा रविवारी पारंपरिक पध्दतीने लोकप्रतिनिधी आणि जवळच्या नातेवाईकांच्या उपस्थित मोठ्या उत्साहात पार पाडला. विशेष यावेळी वधु-वरास संविधान भेट देण्यात आले. नांदुसा येथील युवा उद्योजक आत्माराम पाटील राजेगोरे यांचे बंधू अविनाश अशोक राजेगोरे, अर्धापूर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष गोविंद टेकाळे यांची पुतणी भाग्यश्री बालाजीराव टेकाळे यांचा विवाह विठ्ठलराव देशमुख मंगल कार्यालय पिंपळगाव महादेव येथे मोठ्या उत्साहात पार पडला. खा. अशोक चव्हाण यांनी विवाह सोहळ्यास उपस्थित राहून वधू - वरास शुभ आशीर्वाद दिले. त्यांच्यासह यावेळी माजी आ. अमर राजूरकर, आ. मोहन हंबर्डे, आ. बालाजी कल्याणकर माजी आ. हानुमंत बेटमोगरेकर, उद्योजक नरेंद्र चव्हाण, भाजप जिल्हाध्यक्षा पुनमताई पवार, चेअरमन गणपत तिडके, कुणबी महासंघाचे संस्थापकीय अध्यक्ष गिरीश जाधव, जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, माजी नगरसेवक प्रतिनीधी संतोष मुळे, शैलेश कराळे, दत्ता पाटील पांगरीकर, निवृत्त वैद्यकीय अधिकारी उत्तम इंगळे, नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संजय देशमुख लहानकर, बालाजी गव्हाणे, राजेश्वर शेट्टे, संचालक निळकंठ मदने, ज्ञानेश्वर पाटील राजेगोरे, गांधी पवार, जिल्हाध्यक्ष हानुमंत राजेगोरे,साबेर शेख. नागोराव भांगे पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य रामराव भालेराव, लक्ष्मीकांत मुळे, सखाराम क्षिरसागर, गुणवंत वीरकर, छगन सांगोळे, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कदम, उपाध्यक्ष छगन इंगळे, इरफान पठाण, गंगाधर सोनटक्के, युनुस नदाफ, उद्धव सरोदे, गुणवंत सरोदे, भिम शक्तीचे जिल्हाध्यक्ष सुरेश हटकर, माजी उपमहापौर प्रतिनीधी अब्दुल गफार, माजी सभापती मसूद शेख, माजी गटनेते शेरआली , शेख बिलाल, प्रकल्प व्यवस्थापक शेख अन्सार, यांच्यासह शेतकरी, राजकीय, शासकीय विविध क्षेत्रातील प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी आत्माराम राजेगोरे व पत्रकार गोविंद टेकाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### शांतिदूत गोविंदराव पाटील चिखलीकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त अभिवादन

**नांदेड -** सामाजिक राजकारणाचा वसा जपून समाजाच्या हितासाठी आयुष्य वेचलेले शांतिदूत स्व. गोविंदराव पाटील चिखलीकर यांच्या सातव्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या समाधीस्थळावर पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. खा. प्रताप पाटील चिखलीकर यांच्यासह अनेकांची यावेळी उपस्थित होते. नांदेडच्या राजकीय समाजकारणात आपल्या लोक उपयोगी कार्याने चिरस्मरणात राहिलेले शांतीदूत स्व. गोविंदराव पाटील चिखलीकर यांचा आज सातवा स्मृतिदिन होता. स्मृतिदिनानिमित्त चिखली येथील त्यांच्या समाधी स्थळी खा. प्रताप पाटील चिखलीकर यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी डॉ. प्रमोद पाटील चिखलीकर, ॲड. संदीप पाटील चिखलीकर, सचिन पाटील चिखलीकर , ललिताबाई चिखलीकर , प्रतिभाताई चिखलीकर , मिलिंद देशमुख, प्रवीण साले, संजय घोगरे, संतोष क्षीरसागर, किशन डफडे, भगवान राठोड, श्रावण पाटील भिलवंडे, विजय गंभीरे , बाळू पाटील जानापुरीकर, अजय बिसेन, आनंदराव पाटील ढाकणीकर, शैलेश पाटील करहाळे, सुरेश राठोड, किरण वटमवार, प्रल्हाद उमाटे, दिगंबर गायकवाड यांच्यासह लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील शेकडो कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

### जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करा

**मुदखेड -** शहरात जनावरांचा बाजार रविवार या दिवशी खुप मोठ्या प्रमाणात भरत असतो त्या बाजारात नांदेड जिल्ह्यातील विविध तालुक्यातील व कर्नाटक, तेलंगणा राज्यातील नागरिक जनावरे खरेदी विक्रीसाठी आणतात पण त्या बाजार परिसरात जनावरांना व नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी खुप संघर्ष करावा लागतो. सद्या नांदेड जिल्ह्याचे तापमान ४२ओ ते ४३ओ एवढे वाढले असून नागरिकांना व जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी तापत्या उन्हात खुप वेदना सहन कराव्या लागतात. म्हणून मुक्या जनावरांसाठी नगर परिषदेने त्वरित उपाय योजना करून त्यांना पिण्याच्या पाण्यासाठी व सामान्य नागरिकांसाठी नळ उभारून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात यावे. अशी मागणी मुदखेड काँग्रेस पक्षाच्या वतीने मुदखेड नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना विनंती अर्जाद्वारे मागणी केली आहे. यावेळी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे मुदखेड शहरअध्यक्ष कैलास आण्णा गोडसे, उपनगराध्यक्ष करीम खासाब, सुर्यकांत चौदंते शहर उपाध्यक्ष, मुजीब पठाण शहर युवक अध्यक्ष, मो.अतिक शहर सचिव, गिरीष कोत्तावार, गजानन संबोड, इकबाल खुरेशी, मो.मोईन, आकाश सोनटक्के युवक शहर सचिव यांच्यासह आदिं कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



# मानव विकासच्या १४ बसेस बंद; बिलोली-गंजगाव बस पूर्ववत सुरू करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली, ८ मे -**

ग्रामीण भागातील एकूण १४ मानव विकास च्या गाड्या बंद कराव्या लागल्या. त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेची मोठ्या प्रमाणात गैरसोय होतानाचे चित्र दिसून येत आहे. तब्बल सात गाड्या अन्यत्र देण्यासाठीचे नियोजन आणि मोजक्या गाड्यांमध्ये लोकांच्या समस्या सोडविणे बिलोली आगारासाठी मोठ्या तारेवरची कसरत निर्माण झाली आहे.

बिलोली तालुक्यातील अरजापूर, कुंडलवाडी, दौलापूर, गंजगाव इत्यादी गावातील ग्रामस्थांना सोय व्हावी म्हणून सीमा भागातील सरपंच आणि समन्वयक यांनी वारंवार प्रयत्न करून ग्रामस्थांची होणारी दळणवळणाची हेळसांड लक्षात आणून दिली. गंजगाव येथील शाळेच्या विद्यार्थ्यांची सोय करण्यासाठी मानव विकास अंतर्गत बसची व्यवस्था करण्यात आली होती. शाळा संपताच सदर बस बंद करण्यात आली. हीच अवस्था तब्बल १४ ठिकाणी निर्माण झाली आहे. मानव विकासच्या १४ गाड्या बंद करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांमुळे गावकऱ्यांना होणारा दळणवळणाचा लाभ बंद झाला आहे. बस आगार आपले उत्पन्न वाढविण्यासाठी लांब पल्ल्याच्या गाड्या सोडण्यामध्ये अधिक व्यस्त असल्याचे चित्र दिसून येते यातच अनेक गाड्या इतरत्र स्थलांतरित करणे याचबरोबर गाड्यांची संख्या अपुरी यामुळे आगार प्रमुख आणि ग्रामस्थांचे संबंध बिघडण्याची वेळ निर्माण झाली आहे. याचे नियोजन करताना बिलोली आगारास मोठी कसरत करावी लागत आहे. तेलंगाना आणि महाराष्ट्राच्या सीमालगत भागातील ग्रामस्थांची दळणवळणाची होणारी गैरसोय थांबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांना याबाबत अवगत करण्यात आले. दरम्यान बिलोली येथील आगार प्रमुख यास याप्रकरणी विशेष लक्ष देण्याविषयी कळविण्यात आले आहे. याप्रकरणी आठ दिवसात गाडी न सोडल्यास तीव्र आंदोलन करण्याविषयीचे नियोजन गंजगाव, कोडग्याळ अर्धापूर येथील ग्रामस्थांनी केले असल्याचे सांगण्यात आले. सदर प्रतिनिधीने आगार प्रमुखांशी संपर्क साधला असता वरिष्ठांशी चर्चा करून यथायोग्य निर्णय घेण्यात येईल. ग्रामस्थांची गैरसोय दूर करण्यासाठी आम्ही सकारात्मक आहोत. असे कळविले आहे. विभागीय नियंत्रक आणि महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी याबाबत काय निर्णय घेतात याकडे अनेक ग्रामस्थांचे लक्ष लागून आहे.

### विजेच्या धक्क्याने मृत्यू प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, ८ मे -**

ऊंचेगाव येथील शेतकरी आणि शेतमजूर असलेल्या तरुणाचा दि. ०२ मे रोजी ट्रॅक्टर मध्ये बसून जात असताना लोंबलेल्या विजवाहक ताराला स्पर्श झाल्याने मृत्यू झाला. या घटनेत बेजबाबदारपणे ट्रॅक्टर चालवणारा चालक आणि ईतर तिघांनी संगनमताने हत्या केली अशी तक्रार हदगांव पोलीस ठाण्यात दाखल केली असून सर्व संबंधितांवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी मयत तरुणाचे वडील शिवाजी शामराव शिंदे यांनी केली आहे.

याप्रकरणी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, दि. ३० एप्रिल रोजी तुकाराम शामराव शिंदे आणि गोविंद मारुती शिंदे रा. ऊंचेगाव (खु) यांनी माझा मुलगा गजानन शिवाजी शिंदे वय २२ वर्षे हा घरी बसलेला असतांना कामानिमित्त बोलावून नेऊन कट रचून हत्या केली. त्याच दिवशी आम्ही तक्रार केली होती. परंतु अद्याप या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला नाही. आपल्या तक्रार अर्ज शिवाजी शिंदे यांनी पुढे म्हटले आहे की, तुकाराम यांनी ट्रॅक्टरवर शेणखत टाकण्याचे काम करण्यासाठी शेतमजूर म्हणून नागेश अशोक शिंदे, विशाल दिलीप शिंदे, संदीप सटवा शिंदे या तीन तरुणांसोबत मुलाला घेऊन गेले. परंतु माझ्या मुलाची लोंबकळत असलेल्या विजवाहक तारेखाली ट्रॅक्टर थांबवून मुलाला या सर्वांनी तारेवर ढकलून दिले. असा आरोप अर्जात केलेला आहे. संबंधित सर्वांवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी या अर्जात करण्यात आली आहे.


**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate** : **PANKAJA GOPINATHRAO MUNDE**
**Name of political party** : **Bharatiya Janata Party**
**Name of Election** : **House of People (Lok Sabha Election - 2024)**
*** Name of Constituency** : **39 - Beed Parliamentary Constituency**

**I Pankaja Gopinathrao Munde,** a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents :

**(A)**

| Sl. No. | Pending Criminal cases | | | |
|---|---|---|---|---|
| | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
| 1. | 3rd Jt. C.J.J.D. and J.M.F.C. Pimpri | S.C.C. No. 3574/2023 (F.N. 6635/2023) Dtd. 05-12-2023 | Unready Board | Section 188, 279 Of Indian Penal Code and under section 51-B of Disaster Management Act and Section-3 of Epidemic Diseases Act Violation of Disaster Management Act and Epidemic Diseases Act. |
| 2. | Jt. C.J.J.D. and J.M.F.C. Patoda | S.C.C. No. 185/2022 (F.N. 1366/2022) Dtd. 05-09-2022 | Argument on Exhibited-unready | Section 188, 269, 270 of Indian Penal Code and under Section 51-Disaster Management Act Violation of Disaster Management Act. |

**(B)**

| Sl. No. | Details about cases of conviction for criminal offences | | | |
|---|---|---|---|---|
| | Name of Court and date(s) of order(s) | Case No. And dated | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
| 1. | Not Applicable | Not Applicable | Not Applicable | Not Applicable |

Name & Signature of Candidate
**(Pankaja Gopinathrao Munde)**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# दिलखुलास'कार्यक्रमात बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांची मुलाखत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ एप्रिल**

'लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी बीड जिल्हा प्रशासन सज्ज' याविषयी बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांची मुलाखत घेण्यात आली आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात, शुक्रवार १० मे २०२४ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल ॲपवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत ही मुलाखत प्रसारित होणार आहे. पत्रकार अतुल कुलकर्णी यांनी ही मुलाखत घेतली आहे.

बीड जिल्ह्यात असलेले लोकसभा निवडणूक मतदार संघ, लोकसभा निवडणुकीचे कामकाज पार पडण्यासाठी सुरू असलेली कार्यवाही, मतदान केंद्र व मतमोजणी केंद्रांवर करण्यात आलेली तयारी, मतदार जनजागृती उपक्रम, कायदा व सुव्यवस्थेबाबतचे नियोजन, सर्व घटकातील मतदारांसाठी करण्यात आलेल्या सोयीसुविधा याबाबत बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांनी या मुलाखतीत माहिती दिली आहे.

# बीड विधानसभा मतदारसंघातील कर्मचाऱ्यांनी ईडीसी प्रमाणपत्र तहसील कार्यालयातून प्राप्त करावे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ एप्रिल**

मतदानापासून आपले कर्मचारी अधिकारी वंचित राहू नये, यासाठी बीड लोकसभा मतदार संघाअंतर्गत बीड विधानसभा मतदारसंघातील अधिकारी/ कर्मचारी यांनी बीड तहसील कार्यालयातून निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याचे सहाय्यक निवडणूक अधिकारी कविता जाधव यांनी कळविले आहे.

बीड विधानसभा मतदार संघांतर्गत कार्यरत अधिकारी, कर्मचारी ज्यांनी प्रथम प्रशिक्षण यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे केले आहे त्या ठिकाणी त्यांनी १२ (अ) अर्ज भरून दिलेले होते. अशा सर्व निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त अधिकारी कर्मचारी यांचे निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्रचे वाटप तहसील कार्यालय बीड येथील पहिल्या मजल्यावर सुरू असून दि. ११ मे २०२४ तारखेपर्यंत ईडीसी प्रमाणपत्र करुन घ्यावे, असे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव यांनी कळविले आहे.

# वडार समाजाचा बजरंग सोनवणे यांना पाठिंबा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ एप्रिल**

बीड येथील वडार समाजाच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. बीड येथील प्रकाश नगर मध्ये रहिवाशांची दीपक चौगुले यांच्या उपस्थितीत बैतक झाली. बैठकीत या भागात अद्यापही कोणी सार्वजनिक शौचालय, रस्ते, पाणी, वीज या मूलभूत सुविधा दिलेल्या नाहीत यावर चर्चा झाली. येत्या लोकसभा निवडणुकीत शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांना.पाठिंबा देण्याचा त्यांनी सर्वानुमते निर्णय घेतला. कारण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि महाविकास आघाडी ही धर्मनिरपेक्ष असून जातीवादी पक्ष जे संविधान बसल्याची भाषा करून जाती पतीचे राजकारण करतात. समाजात तेढ निर्माण करत आहेत. अशा शक्तींना रोखण्यासाठी बजरंग सोनवणे यांना त्यांनी पाठिंबा दिला आहे.



दरम्यान निर्णया नंतर प्रकाश नगर येथे रहिवाशांनी एक बैठक घेतली. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे, शेकापचे नेते भाई मोहन गुंड, धम्मपाल कांडेकर आणि डॉ.हर्षदा सोनवणे, जाधव मॅडम यांच्यासह संयोजक उपस्थित होते. या बैठकीला या भागातील महिला व नागरिक यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपाकडून अंबाजोगाईत धर्माचे राजकारण केले

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ एप्रिल**

भाजप जेव्हा हरायला लागते तेव्हा धर्माची ढाल करते आणि शेवटी तो प्रयत्न माझ्या जिल्ह्यात झाला मात्र भाजपला पराभव चुकणार नाही आता द्वेषाचे राजकारण खूप झाले मोदी आले आणि त्यांनी कुठलेही आश्वासन दिले नाही उलट आरक्षण न देण्याची आणि मुस्लिम द्वेषाची पेरणी करत बीड मधील व देशातील अल्पसंख्याक समुदायाच्या भावना दुखवल्या आहेत . भाजपने धर्मांध राजकारन बंद करावे बीड फुले शाहू आंबेडकर विचाराचा आहे त्यामुळे भाजप नैतिक पातळीवर हारली असून आता केवळ मतदान आणि निकालाची औपचारीकता मागे असल्याचे बजरंग सोनवणे यांनी म्हटले.

अंबाजोगाई येथील सभेत मोदी काय म्हटले तर त्यांचे भाषण होते सर्व मुस्लिम द्वेषी . भीती वाढवून मते मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न केला आहे . इंडिया आघाडीचा एकच अजेंडा आहे ,सरकार मध्ये आल्यावर वर मिशन कॅन्सल चालविणार, आर्टिकल ३७० संपुष्टात येईल, CAA NRC कायदा संपुष्टात येईल,

तीन तलाक संपविणार इंडिया आघाडी, किसान सन्मान निधी पैसे कॅन्सल करतेन, मोफत अन्नधान्य संपविणार देशातील ५५ करोड लोकांना ५ लाखा पर्यत मोफत आरोग्य सेवा संपुष्टात येईल काँग्रेस सरकार इंडिया आघाडी राम मंदिर सुद्धा संपविणार सत्तेत आल्यावर महाराष्ट्र मधील काँग्रेस चा मुख्य नेता पंचवीस वर्ष काँग्रेस मध्ये राहून आलेला अस भाजप मध्ये आल्यावर बोलला,राहुल गांधी ज्यांचा मोदी ने भाषणात शहजादा म्हणून उल्लेख केला ते सुप्रीम कोर्ट मधून राम मंदिर चा निकाल बदलतेन तीन तलाक,शहा बानो केस मध्ये सुप्रीम कोर्ट चा निर्णय बदलला होता.असच राम मंदिर च्या निर्णयाला पलटून टाकतेंन इंडिया आघाडीच्या नेत्याने सांगितले आहे राम मंदिर बेक्कार आहे म्हणून हाच नेता राम मंदिर च्या पूजेला पाखड् म्हणत आहे.असले वक्तव्य स्वप्नात सुद्धा बोलू शकले नसते,पण दृष्टी साठी,वोट बँक साठी हे आज असले वक्तव्य करत आहे.वारंवार राम चा प्रभू श्रीराम चा अपमान करत आहे.असले लोक महाराष्ट्र च्या गौरव कसे वाढवणार.इंडिया आघाडीचे लोक वोट जिहाद साठी २६ /११ चे हल्ल्यातील लोकाना किलीन चिट देणार आहे.कसाब सोबत १० जण येणारे आतंकवादी त्यांना काँग्रेस पाठबळ देत आहे.देश विचारणार काँगेस च्या लोकांना काँग्रेस आणि आतंकवाद यह रिशता क्या कहलाता है...दिल्ली मध्ये झालेल्या बाटला हाऊस च्या हल्ल्यात काँग्रेसची मोठे नेता रडत बसली होती

मोदी चट्टन सारखा(पहाडा) तुमच्या समोर उभा आहे

राहुल गांधी एक चाल खेळत आहे.आदिवासी मागास लोकांचे आरक्षण सकावून घेऊन धर्माच्या नावावर आरक्षण देणार आहे.कर्नाटकात काय केलंय `लल ला रात्रीतून आरक्षण दिलंयकर्नाटक मधील सर्व मुस्लिमाना रात्रीतून `लल काँग्रेस ने केलंयओबीसी समुद्राय यांना २७% आरक्षण बाबासाहेब यांनी दिल होतभारताच्या संविधान यांनी दिल होत,संसद ने दिल होत काँग्रेसने कर्नाटक मधील मुस्लिमाना `लल केलंय,`लल च्या आरक्षण मध्ये डाका टाकून चोरी करून मुस्लिमांना आरक्षण दिलंयह्याचा सर्वात मोठा वाटा मुसलमान यांना गेला आहे.काँग्रेस ने जे कर्नाटक मध्ये केलंय असा खेळ तुम्हाला आवडणार आहे का...? असे म्हणत मुस्लिम द्वेष समोर आला आहे . पाठीमागच्या वाटेने दिलेले मुसलमान याना दिलेले आरक्षण तुम्हाला मंजूर आहे का..?हे अस पूर्ण राज्यात आणि देशात करणार आहे.

इंडिया आघाडीच्या नेते पूर्ण पणे मुस्लिम आरक्षण देणार आहे.ळ्र्‍ाी`लल च आरक्षण काढून सर्व मुस्लीम यांना देणार आहे.दलित ,आदिवासी साठी धोक्याची घंटा आहे.सरकार मध्ये आल्यावर हे बुलेट ट्रेन प्रोजेक्ट बंद करतेन. हे भाषण पाहता मोदींनी सलोखा धोक्यात आणल्याचे माझे मत तयार झाले असून यामुळे आता भाजपचा पराभव ही सामूहिक जबाबदारी बनले आहे . मी केवळ निमित्त ही जनतेची लढाई असल्याचे बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे.

# वडार समाज बाप्पांचा विजय घडवणार

## बजरंग बली आम्ही आध्यत्मिक आणि राजकीय अस्मिता -दीपक चौगुले

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ एप्रिल**

वडार समाज दगड फोडणारा , काबाड कष्ट करणारा आणि मुख्य प्रवाहापासून दूर असलेला हा समाज विकासाच्या समीप आणेल असा शब्द देत बजरंग सोनवणे यांनी बीड शहरातील इमामपूर रोड वर झालेल्या प्रचार सभेत समाजाला कधी विसरणार नसल्याचे सांगितले यावेळी समाज सेवक दीपक चौगुले यांनी आम्ही दगडातून देव घडवतो आता आम्ही बाप्पा च्या रूपाने खासदार घडवू असे म्हटले .

बार्शी नाका भागात वडार समाजातील बांधवांच्या समवेत बजरंग सोनवणे यांनी तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह घेऊन मते मागितली . आपन समाजाचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी आपली खासदारकी पणाला लावू .

यावेळी दीपक चौगुले यांनी पोटतिडकीने समाजाचे प्रश्न मांडले . आम्ही मुख्य प्रवाहात नाहीत आपण आम्हाला मदत करा असे आवाहन केले यावेळी व्यासपीठावर उमेदवार बजरंग सोनवणे , शेकाप चे नेते भाई मोहन गुंड , डॉ हर्षदा सोनवणे , गंगाधर गाडे यांचे संघटनेचे प्रदेश अध्यक्ष धम्मा कांडेकर युवक अध्यक्षा विद्याताई जाधव आदींची उपस्थिती होती.

लहान लहान समुदाय तुतारी वाजवू लागले

भाजपने आजवर केवळ आमचा वापर केला मोठया समुदायाची भीती दाखवायची आणि मते घाययची असे राजकारण होत आले आहे मात्र यावेळी आम्ही चुकणार नाही असे म्हणत बलुते ओबीसी आणि कष्टकरी समुदाय बजरंग सोनवणे यांना पाठिंबा देताना दिसत आहेत

# संविधान वाचविण्यासाठी लोक एकत्र- आ.संदीप क्षीरसागर

## बजरंग सोनवणेंच्या प्रचारार्थ शहर आणि ग्रामीण भागात कॉर्नर सभा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ एप्रिल**

इंग्रजांना या देशातून हाकलून देण्यासाठी ज्याप्रकारे लोक एकत्र आले होते त्याचप्रकारे आता सविंधानाचे रक्षण करण्यासाठी भाजपाला हाकलून देण्यासाठी सर्व जातीधर्माचे लोक एकत्र आले आहेत. आणि इतिहासात ज्याप्रकारे सर्व भारतीयांनी मिळून देशाला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त केले त्याचप्रकारे आताही सर्व देशवासी मिळून भाजपाच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करणार आहेत. असे प्रतिपादन आ.संदीप क्षीरसागर यांनी बजरंग सोनवणेंच्या प्रचारार्थ झालेल्या कॉर्नर सभांमध्ये केले.



सध्या बीड मतदारसंघातील शहर आणि ग्रामीण भागात जाऊन महाविकास आघाडीचे लोकसभा उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारासाठी आ.संदीप क्षीरसागर कॉर्नर सभा घेत आहेत. दरम्यान सोमवारी (दि.७) रोजी सायंकाळी बीड शहरातील पेठ बीड भागातील बालाजी मंदिर येथे व सुभाष रोड येथे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे, माजी मंत्री सुरेश नवले व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्या उपस्थितीत कॉर्नर सभा झाली. तसेच मंगळवार (दि.७) रोजी बीड तालुक्यातील विविध गावांमध्ये तसेच शहरातील नवा मोंढा येथे आ.संदीप क्षीरसागर यांनी कॉर्नर बैठका घेतल्या. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.सुनील धांडे तसेच स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ गेवराईत मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.८ एप्रिल**



मराठवाड्यातील शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी तयार केलेली महत्वाकांक्षी योजना उध्दव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असताना रद्द केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारकडून पन्नास हजार कोटी रुपये मंजुर करून ही योजना पुन्हा कार्यान्वित करण्याचे प्रयत्न सध्या आम्ही करत आहोत. मराठवाड्यावरील दुष्काळाचा कलंक कायमस्वरुपी पुसण्यासाठी पंकजाताईंना निवडून देण्याचे आवाहन माजीमंत्री आ.बबनराव लोणीकर यांनी केले. महायुतीचा धर्म प्रामाणिकपणे निभावत गेवराई विधानसभा मतदार संघातील सर्वाधिक मताधिक्य देवून असा विश्वास माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केला. गेवराई येथे आयोजित मेळाव्यात ते बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आयोजित कार्यकर्ता मेळाव्याला मोठा प्रतिसाद मिळाला.

बीड लोकसभा मतदार संघातील महायुतीच्या अधिकृत उमेदावार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ सोमवार, दि.६ मे रोजी गेवराई येथे कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. राज्याचे माजी पाणीपुरवठा मंत्री तथा भाजपाचे निरीक्षक आ.बबनराव लोणीकर, जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. जालना भाजपाचे युवा नेते विश्वजित खरात, रिपाई आठवले गटाचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, भवानी बँकेचे उपाध्यक्ष मोहम्मद गौस यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते. मेळाव्याला मोठा प्रतिसाद मिळाला.

# निवडणुकीसाठी कर्तव्यार्थ पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच मतदान कर्मचारी यांच्यासाठी ९ ते ११ मे पर्यंत तहसील कार्यालयात मतदान सुविधा उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ एप्रिल**

मतदानापासून कोणतेही अधिकारी, कर्मचारी वंचित राहू नये यासाठी, बीड लोकसभा मतदार संघाअंतर्गत येणारे २३०-बीड विधानसभा मतदारसंघात दि.९, ते दि.११ आणि दि.१२ मे रोजी पोस्टल मतदान घेण्यात येणार, असल्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, कविता जाधव यांनी कळविले आहे.

बीड विधानसभा मतदारसंघा अंतर्गत कार्यरत पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी बीड तहसील कार्यालयात सुविधा केंद्र उभारण्यात आले असून या ठिकाणी सकाळी ०९ ते सायंकाळी ०५ वाजेपर्यंत मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तसेच दिनांक १२ मे २०२४ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती, कुर्ला रोड, बीड या ठिकाणी सुविधा केंद्र उभारून मतदान घेण्याची व्यवस्था ही करण्यात आलेली आहे.तसेच दिनांक १३ मे २०२४ रोजी मतदान होणाऱ्या इतर जिल्ह्यातील जे अधिकारी, कर्मचारी यांची पोलिंग स्टाफ म्हणून ३९-बीड लोकसभा मतदारसंघ अंतर्गत मतदानाच्या कामासाठी नियुक्ती करण्यात आलेली आहे व ज्यांनी पोस्टल मतदानाचा नमुना क्रमांक १२ अर्ज भरलेला आहे अशा अधिकारी कर्मचारी यांची व पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी तहसील कार्यालय बीड येथे तहसीलदार यांच्या दालनात दिनांक ९ ते ११ मे रोजी पर्यंत सुविधा केंद्र उभारून मतदानाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अशा मतदारांचे पोस्टल बॅलेट मतदानाची व्यवस्था सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत करण्यात आली आहे.



# जिल्ह्याच्या विकासासाठी पंकजाताईंना बहुमताने विजयी करा

## जेष्ठ कार्यकर्त्यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ एप्रिल**

श्री नरेंद्रजी मोदी यांना देशाच्या विकासासाठी तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना लोकसभेत पाठवा असे आवाहन प्रा. सतीश पत्की, पंजाबराव मस्के, राजेंद्र आगवान, डॉ. लक्ष्मणराव नागरगोजे यांनी बीड येथील प्रज्ञावंतांच्या संवाद मिळाव्यात बोलताना केले.



बीड येथे प्रज्ञावंतांच्या मेळाव्याचे आयोजन स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे यांच्या नजीकच्या सहकाऱ्यांनी केले होते.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्व. मुंडे साहेबांच्या प्रतिमेस अभिवादन करून या संवाद मेळाव्यास प्रारंभ झाला कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपचे ज्येष्ठ नेते विजयराव पालसिंगणकर यांनी केले. याप्रसंगी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव नागरगोजे, पंजाबराव मस्के, राजेंद्र आगवान, संतोषराव नागरगोजे, यांनी गेल्या दहा वर्षातील मोदीचे कार्य, स्वर्गीय मुंडे साहेबांचे योगदान, पंकजाताई यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी केलेली कामे याचा उल्लेख केला.संवाद बैठकीचा समारोप प्रा. सतीश पत्की यांनी करून पंकजाताई मुंडे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रवीण इंगळे यांनी केले. या कार्यक्रमास बीड शहरातील प्रज्ञावंतांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त...

### लाभार्थी कलावंतांचे आधार प्रमाणीकरण सुरु

**परभणी,/प्रतिनिधी :** राजश्री शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत यांना मानधन सन्मान योजना लाभार्थ्यांचे आधार प्रमाणिकीकरण (व्हेरिफिकेशन) संदर्भात येथील गंगा मंगल कार्यालयात ४ व ५ मे रोजी दोन दिवस शिबीर आयोजित करण्यात आले होते.

राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाद्वारे राबविल्या जाणाऱ्या राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व कलावंतांना सरसगट पाच हजार रुपये मानधन ऑनलाईन पध्दतीने अदा होत आहे. योजना प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (डीबीटी मार्फत) राबविण्यासाठी अनेक जून्या लाभार्थ्यांची परिपूर्ण माहिती उदा. आधारकार्ड, जन्म दिनांक, मोबाईल क्रमांक वगैरे संकलित करण्याचे काम सुरु आहे. सद्यस्थितीत एकूण ३४ हजार ७२४ कलावंतांपैकी जवळपास २० हजार लाभार्थ्यांचे आधारकार्ड माहिती संचालनालयाकडे उपलब्ध झालेले आहेत. उर्वरीत १४ हजार ७२४ लाभार्थ्यांचे आधारकार्ड व माहिती अद्यापपर्यंत उपलब्ध झाली नाही. या पार्श्वभूमीवर या खात्याद्वारे आधार प्रमाणिकीकरणाचे काम सुरु करण्यात आले आहे.

परभणीतील गंगा मंगल कार्यालयात शनिवार व रविवार दोन दिवस आधार व्हेरिफीकेशनचे काम सकाळी १० वाजल्यापासून सुरु करण्यात आले. त्याद्वारे शहरासह जिल्ह्यातील बहुतांशी लाभार्थ्यांचे आधार प्रमाणिकीकरण करण्यात आले. यासाठी प्रा.डॉ. अशोक जोंधळे, संजय पांडे, आशिष जोंधळे, प्रकाश बारबिंड, कु. अमृता कुलकर्णी, सौ. गीतांजली मुळे, संकेत पांडे, प्रमोद बल्लाळ, सौ. रेवती पांडे, सुरेंद्र पारपेल्ली, बंडू जोशी आदींनी परिश्रम घेतले.

### ऋषिकेश सकनुर यांना अक्षय्य हिंदू पुरस्कार

**परभणी,/प्रतिनिधी:** : विविध सामाजिक कार्यातील सहभागाची दखल घेवून येथील ऋषिकेश सकनुर यांना अक्षय्य हिंदू पुरस्कार समितीचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

हिंदूंनी हिंदूसाठी केलेल्या कामासाठी हिंदू समाजाकडून कृतज्ञता म्हणून दिल्या जाणाऱ्या अक्षय्य हिंदू पुरस्काराचे हे दुसरे वर्ष आहे.ह्यावर्षी अक्षय्य हिंदू पुरस्कार समितीकडे जवळजवळ दोनशे नाम ांकने प्राप्त झाली होती. महाराष्ट्र, गोवा, केरळ, छत्तीसगढ, पंजाब, दिल्ली, तमिळनाडू, पशचिम बंगाल, ओडिशा आणि कर्नाटक या विविध राज्यांतून सुमारे नामांकने आली होती. त्यात ऋषिकेश सकनुर यांच्या नावाची निवड काल पुरस्कार समितीद्वारे करण्यात आली. १८ मे रोजी सायंकाळी ५ वाजता पुण्यातील एसपी कॉलेजच्या लेडी रम ाबाई सभागृहात या पुरस्काराचे वितरण होणार असून प्रख्यात विधिज्ञ आणि हिंदुंच्या न्याय्य हक्कांसाठी न्यायालयात अविरत लढा देणारे तरुण वकील विष्णू जैन ह्यांच्या हस्ते हा पुरस्कार सकनुर यांना प्रदान केला जाणार आहे.

दरम्यान, ऋषिकेश सकनुर यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून विविध हिंदुत्ववादी चळवळींमध्ये सहभाग घेतलेला आहे. जातिभेद निर्मूलन, समतायुक्त समाज, यासाठी ते गेली पंधरा वर्ष काम करत आहेत. त्यात प्रामुख्याने संत चोखोबा ते तुकोबा 'एक वारी समतेची' मंगळवेढा ते देहू या समता वारीच्या आयोजनात त्यांची प्रमुख भूमिका राहिली आहे. तसेच काही दिवसापूर्वी गावातील अनुसूचित जातीच्या नागरिकांना मंदिर प्रवेश करवून घेण्यात देखील पुढाकार घेतला होता. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राच्या माध्यमातून देखील महाराष्ट्र राज्यामध्ये त्यांनी कामास सुरुवात केली आहे. अशा विविध कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार समितीच्या वतीने जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सकनुर यांचे अभिनंदन होत आहे.

### व्यंगचित्रे विनोदा बरोबर संदेश देतात- साहित्यीक डॉ.आसाराम लोमटे

**परभणी,/प्रतिनिधी:** कलावंत होणे हा व्यक्तीचा गुणधर्म आहे, एरव्ही मानव इसम असतो. व्यंगचित्रकार विनोद गोंगे 'विनोदा'बरोबर चित्रांच्या माध्यमातून समाजाला योग्य संदेश देतात, असे मत साहित्यिक डॉ. आसाराम लोमटे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण संघ, शाखा परभणी च्या वतीने जागतिक व्यंगचित्र दिनानिमित्त परभणीत व्यंगचित्रकार विनोद गोंगे यांच्या व्यंगचित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यावेळी लोमटे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी मंचावर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष किशन इदगे, संघाचे नेते मधुकर कदम, गोंगे यांच्या मातोश्री कनकमाला बाई गोंगे, सौ. मीनाक्षी गोंगे आणि ऋतुजा गोंगे आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना अरुण चव्हाळ यांनी सांगितले की, रेषा-रंग आणि शब्दांच्या माध्यमातून व्यंगचित्रकार चित्रांमध्ये आशय भरतो. समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी विनोद गोंगे यांनी शिक्षण, पर्यावरण, महिला आणि पुरुष, युवक -युवती, ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक माध्यमे आदी विषयांवर ४५० दर्जेदार व्यंगचित्रांची निर्मिती केलेली आहे.विनोद गोंगे यांनी, जागतिक व्यंगचित्र दिनाच्या निमित्ताने समाजाला चांगल्या कलाकृती देता आल्या, याचा आनंद आणि समाधान आहे, अशा भावना व्यक्त केल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप राऊलवार यांनी केले, तर उपस्थितांचे आभार पुरुषोत्तम पत्तेवार यांनी व्यक्त केले. यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक संघाचे व्यंकटराव जाधव, सुधीर सोनुनकर, माणिक पुरी, गोकर्ण काळे, वहाब पठाण, धनंजय डोंगरे, अरविंद इंगळे, भारत शहाणे, निल पत्रे वार, मंगेश डोंबे, गजानन मिटकर आदींची उपस्थिती होती.

### भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त शोभायात्रा

**जिंतूर,/प्रतिनिधी:** श्री भगवान परशुराम यांच्या जयंती निमित्त प्रति वर्षी प्रमाणे याहीवर्षी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर शुक्रवारी (दि.१० मे) सायंकाळी ५ वाजता परभणी शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसारातून सायंकाळी ५ वाजता या शोभायात्रेस प्रारंभ होणार आहे. शोभायात्रेत सर्व पुरुष मंडळींनी भगवा किंवा केशरी शर्ट आणि महीलांनी भगव्या किंवा केशरी रंगाची साडी अथवा ड्रेस शक्य असल्यास परिधान करून यावे, तसेच सहकुटुंब, सहपरिवार उपस्थित राहून शोभायात्रेची शोभा वाढवावी, असे आवाहन भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहिराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# अचानक लागलेल्या आगीत घर जळून खाक

## शेतकऱ्याचा संसार आला उघडयावर, नुकसान भरपाईची मागणी





**जिंतूर/प्रतिनिधी :** अचानक लागलेल्या आगीत घरातील संपूर्ण साहित्य जळून भस्मात झाले ही घटना तालुक्यातील कोरवाडी येथील गट नंबर २३६ मधील शेतात घडली असून या घटनेमुळे कष्टकरी शेतकऱ्यांचा संसार उघड्यावर आला आहे.

तालुक्यातील कोरवाडी येथील रामेश्वर हरसिंग राठोड (६७) हे आपल्या पत्नी व मुलासह राहत असून दि.३ शुक्रवारी रोजी सकाळी ११:३० वा. राठोड यांच्या घराला अचानक आग लागली. शेतात काम करत असताना आग लागल्याचे लक्षात येताच त्यांनी आपल्या पत्नी, सुन व मुलासह घटनास्थळाकडे धाव घेत आगीवर पाण्याचा मारा केला. उन्हाची तीव्रता पाहता त्यांचे अफाट प्रयत्न कमी पडले. अन पाहता पाहता संपूर्ण घराची राख रांगोळी झाली. आगीत सोयाबीन, नुकताच शेतातून काढलेला भुईमूग, कपडे, दोन स्प्रिंकलर सेट, नातवांचे शैक्षणिक साहित्य, महत्त्वाची कागदपत्रे, अंगावरील घरात ठेवलेल सोन आणि लोखंडाच्या पेटीत ठेवलेली रोख रक्कम जळून खाक झाल्याने राठोड यांचे जवळपासप ३ लाखाचे नुकसान झाले असून राठोड कुटुंबियांचा संसार उघड्यावर आला आहे. आगीची माहिती मिळताच गावातील सरपंच दिनकर आलाटे यांनी ही माहिती तहसील प्रशासनास फोन द्वारे कळवून सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास सदरील घटनेचा पंचनामा तलाठी विकास आगलावे यांनी केला. मदतीची अपेक्षा असून तशी मागणीही आहे. राठोड कुटुंब यांना लागणारे संसार उपयोगी साहित्य मदत स्वरूपात पंचकोशातील नागरिकांनी आपल्या परिस्थितीनुसार मदतीचा हात द्यावा, असे आवाहन कोरवाडी येथिल दिनकर आलाटे यांनी केले.

### जनार्दन विधाते यांची स्ट्राँग रुमला भेट

**परभणी,/प्रतिनिधी-** लोकसभा निवडणुकीमध्ये मतदान झालेले मतदान यंत्र येथील कृषी विद्यापीठाच्या कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात आलेले आहेत. या स्ट्राँग रूमला उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जनार्दन विधाते यांनी मंगळवारी (दि.७) सकाळी ११ वाजता भेट देवून पाहणी केली.यावेळी स्ट्राँग रुमच्या सुरक्षा व्यवस्थेवर तैनात करण्यात असलेल्या जवानांची आणि पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांशी चर्चा केली. आढावा घेतला. यावेळी त्यांच्यासमवेत अव्वल कारकून दत्त गिणगीने, सुरक्षेसाठी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### रसवंतीगृहे भरगच्च

**परभणी,/प्रतिनिधी-** उन्हाचा पारा चांगलाच वाढलेला असून सध्या जिल्हयाचे तापमान ४२ अंशावर गेले आहे. त्यामुळे अंगाची लाहीलाही होत असतांना नागरिकांना विसावा म्हणून रसंवती गृहात जावून थोडासा विसाव घेत आहेत. व रसवंती गृहे भरगचच्च आहेत.

### बोरी जवळ दोन वाहनात समोरासमोर जोरदार धडक, नागरिकांची घटनास्थळी धाव

**बोरी,/प्रतिनिधी:** जिंतूर तालुक्यातील बोरी जवळील करपरा नदीच्या पुलालगत मंगळवारी रात्री दोन वाहनात समोरासमोर जोरदार धडक झाली. त्यात काही प्रवाशी जखमी झाले.

आयशर एम.एच. २२ ए.एम. ४५९५ व टाटा मेक्सॉल एम.एच. २२ ए.एम. ३९५३ ही दोन वाहने एकमेकांवर आदळली. या जोरदार धडकेने दोन्ही वाहनातील प्रवाशी जखमी झाले. प्रत्यक्षदर्शनींनी तातडीने या जखमींना परभणी जिल्हा शासकीय रुग्णालयाकडे उपचारार्थ रवाना केले. दरम्यान, करपरा नदीवरील या पूलाचे काम गेल्या कित्येक महिन्यांपासून अर्धवट अपस्थेत रेंगाळले आहे.

### श्रीस्वामी समर्थ केंद्रात अखंड नाम सोहळा



**जिंतूर,/प्रतिनिधी-** श्रीस्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त २९ एप्रिलपासून जिंतूर स्वामी समर्थ केंद्रात स्थापित देवता हवन, नित्य स्वाहाकार, श्रीगणेश याग, श्री मनोबोध याग, नित्य स्वाहाकार स्वामी याग, नित्य स्वाहाकार चंडीयाग, नित्य स्वाहाकार, श्री गीताई याग, नित्य स्वाहकर, श्री रुद्र याग, मल्हारी याग, नित्य स्वाहाकार बली पुशहुती आदी धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. यात मोठ्या संख्येने पंचक्रोशीतील भाविकांची उपस्थिती होती. नामजप सोहळ्याची सांगता सोमवारी धार्मिक कार्यक्रमांनी होणार असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. सेवेकरी केंद्रप्रमुख विश्वनाथ वाघ , अमित घुगे, मुळ शास्त्री मुकेश मुथा संभाजीनगर,आबासाहेब देशमुख, आहेर भोकर ,लखुजी जाधव ,माधव मोरे ,वसंतराव देशमुख ,उद्धवराव देशमुख ,मंचकराव देशमुख , सचिन रायपत्रीवार, कोल्हाळ , पिन्टू अप्पा, रवी घुगे ,चौहान ताई. थिटे ताई.सुनितातााई.डाकेताई. वाघताई नगरताई,जगतापताई अनेक सेवेकरी आहेत.

# रासायनिक खतांच्या किंमती तातडीने कमी करा- दबाव गटाची मागणी

**सेलू,/प्रतिनिधी -** सध्या सगळीकडे खतांच्या किमती वाढत असल्याचे विविध प्रसारमध्यमांवर दिसत आहे.यामुळे शेतकरी आधीच आर्थिक संकटात असतांना रासायनिक खतांची भाववाढ ही शेतकऱ्यांना धसका देणारी आहे.त्यामुळे तातडीने ही भाववाढ रद्द करण्याची मागणी सेलू तालुका दबाव गटाच्या वतीने आज दि ०६ मे रोजी कृषी मंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,आधीच अपूरा पाऊस तर कधी अवकाळी पाऊस याने शेती व्यवसाय संकटात आला आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग हैराण आहे. त्यात पुन्हा शेत मालाला भाव नाही. चोहोबाजूने शेतकरी पिळून काढला जात आहे.
त्यात आता पुन्हा रासायनिक खतांच्या किंमतीत विनाकारण भरमसाठ वाढ करण्यात आल्याच्या बातम्या सातत्याने चालू आहेत. त्यात दिसणारी भाववाढ ही अत्यंत अन्यायकारक आहे. शासनास व खत, औषधी कंपन्यांना शेती व्यवसाय बंद करायचा की काय?अशी अवस्था निर्माण झाली आहे तसेच खरीप हंगामापूर्वी ही केलेली भाववाढ तात्काळ रद्द करण्यात यावी त्याच प्रमाणे पूर्विच्याच दरात खरीप हंगामात पुरेसा व दर्जेदार खत, औषधी पुरवठा करण्याबाबत सक्त सूचना कृषी विभाग जिल्हा परिषद् यांना देण्यात यावी.बोगस अप्रमाणित खते, बियाणे व औषधी पुरवठा करण्याऱ्या कंपन्या व विक्री करणारे व्यापारी यांचेवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.
अँड श्रीकांत वाईकर अँड. टी.ए. चव्हाण, ओमप्रकाश चव्हाळ, इसाक पटेल, आबासाहेब भुजबळ,गुलाबराव पौळ, रामचंद्र कांबळे, दत्ता कांगणे,सतीश काकडे,लक्ष्मण प्रधान, भारत रवंदळे, लिंबाजी कलाल, जलाल भाई, चिंतामण दौंड, रामचंद्र आघाव, दिलीप मगर, महादेव लोंढे, मुकुंद टेकाळे, उध्दव सोळंके, नारायण पवार,अजित मंडलीक, राजेंद्र केवारे, दिलीप शेवाळे,रौफ भाई, शेख मतिन दादामिया, चंद्रकांत चौधरी, अँड. उमेश काष्टे, अँड. योगेश सूर्यवंशी, ऍड पांडुरंग आवटी, परमेश्वर कादे, प्रमोद वीर, डॉ. गणेश थोरे, अँड. देवराव दळवे, उत्तम गवारे, गणेश सोळंके, विलास रोडगे, दत्ता गायके, गणपत मिटकरी आदींची नावे आहेत.



**जिंतूर- रात्री दि ७/५/२०२४ रोजी संध्याकाळी ७.३० वाजता मा.तालुका कृषी अधिकारी जिंतूर यांचे मार्गदर्शनाखाली - किशोर शेळके मं कृ अ जिंतूर,कृषी पर्यवेक्षक एस डी सोळंके व कृषी सहायक जि.टी.राठोड,अंबरवाडी यांचे मार्फत मौजे अंगलगाव, तालुका जिंतूर येथे गाव बैठक घेण्यात आली सदरील बैठक शेतकरी यांच्या वेळेनुसार संध्याकाळी घेण्यात आली सदरील बैठकीमध्य सोयाबीन उगवणशक्ती प्रात्यक्षिक ,सोयाबीन बीज प्रक्रिया, वरील पेरणी तंत्रज्ञान, बेड वरील लगवड तंत्रज्ञान, मूलस्थानी जलसंधारण,शंखी गोगलगाय मार्गदर्शन, कापूस फरदड मुक्ती अभियान , रो ह यो फळबाग लागवड बाबत मार्गदर्शन करुण २० जून पर्यंत अर्ज करण्या संबंधी आव्हान करण्यांत आले, तसेच भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड बद्दल व महाडीबिटी वर वेगवेगळ्या योजने साठी अर्ज करण्यास सांगून शेततळे बाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले, या नियोजन सभेसाठी गावातील सरपंच अमोल मुंढे, संपर्क शेतकरी ज्ञानेश्वर कांडूरे, योगेश कांडूरे, सुभाषराव, माऊली, भगवान, पोलीस पाटील जिवन जाधव, बचत गटातील सदस्य आणि समस्त गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : House of People (Loksabha Election) -2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending criminal cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 39 - Beed Parliamentary Constituency | Pankaja Gopinath Munde | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | 3rd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Pimpri S.C.C.No. 6635/ 2023 Dtd. 05.12.2023 Unready Board | IPC 188, 279 Disaster Management Act 51B, Epidemic Diseases Act 3 | NIL | NIL | NIL |
| 2. | | | Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Patoda S.C.C.NO. 1366/ 2022 Dtd.05.09.2022 Argument on Exhibited -unready | IPC 188, 269, 270 Disaster Management Act 51B | NIL | NIL | NIL |

Name of constituency : **39 - Beed Parliamentary Constituency**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule**
**President, Bharatiya Janata Party, Maharashtra**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीच्या पेन्शनपुरा भागातून ४२ जनावरे पोलिसांच्या पथकाने पकडली

## पोलिसांकडून जनावरांच्या चारा, पाण्याची व्यवस्था



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ मे**

शहरातील पेन्शनपुरा भागातून शहर पोलिसांच्या पथकाने तब्बल ४२ जनावरे संशयावरून पकडली आहेत. सर्व जनावरे ताब्यात घेऊन हिंगोली शहर पोलिस ठाण्यात आणली असून या प्रकरणी पोलिसांनी सहा ते सात जणांची चौकशी सुरू केली आहे. जनावरांमध्ये गायी, वासरे तसेच बैलांचा समावेश आहे.

शहरातील पेन्शनपुरा भागातील सहा ते सात घराजवळ जनावरे बांधलेली असल्याची माहीती पोलिसांना मिळाली होती. सदर जनावरांची अवैधरित्या वाहतूक करून आणण्यात आल्याचा संशय असल्याने पोलिसांनी जनावरे ताब्यात धेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पोलिस अधीक्षक जी. श्रीधर, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर सपोनि गजानन मोरे, बोधगिरे, उपनिरीक्षक कपील आगलावे, जमादार अशोक धामणे, संभाजी लेकुळे, धनंजय क्षीरसागर, संजय मार्के यांच्यासह पोलिसांचा मोठा ताफा मंगळवारी रात्री या भागात पोहोचला.

दरम्यान, त्याठिकाणी ४२ जनावरे आढळून आली. पोलिसांनी सदर जनावरांबाबत चौकशी केली असता समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. त्यामुळे पोलिसांनी सर्व ४२ जनावरे ताब्यात घेऊन हिंगोली शहर पोलिस ठाण्यात आणली आहेत. यावेळी सहा ते सात जणांनी सदर जनावरे आपल्या मालकीची असल्याचे सांगत जनावरांचे दाखले असल्याचे सांगितले. त्यावरून पोलिसांनी त्यांना जनावरांचे दाखले दाखविण्याची सुचना केली आहे.

परंतु दि ८ मे सकाळपर्यंत जनावरांचे दाखले घेऊन कोणीही पोलिस ठाण्यात आले नाही. त्यामुळे पोलिसांनीच जनावरांची देखभाल सुरू केली आहे. जनावरांना चारा पाणी पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर आणि त्यांचे सहकारी देतांना दिसत आहेत. जनावरांच्या मालकांनी दाखले दाखविल्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# अक्षयतृतीयेच्या दिवशी होणारे बालविवाह थांबवावेत

## जिल्हाधिकारी पापळकर यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ मे**



अक्षय तृतीयेच्या दिवशी मोठ्या प्रमाणात विवाह होतात. दि. १० मे, २०२४ रोजी अक्षय तृतीया असल्याने या दिवशी होणारे संभाव्य बालविवाहाच्या घटना रोखण्यासाठी सर्व यंत्रणांनी खबरदारी घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी आणि अक्षय तृतीयेच्या दिवशी होणारे बालविवाह थांबवावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ संपूर्ण राज्यात लागू करण्यात आलेला आहे. तसेच त्याबाबतचे नियम महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २०२२ देखील लागू करण्यात आलेला आहे. या नियमानुसार बालविवाह आयोजित करणे अजामीनपात्र गुन्हा आहे. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना शहरी भागासाठी तर ग्रामीण भागासाठी ग्रामसेवकांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. तसेच ग्रामीण भागासाठी अंगणवाडी सेविका व शहरी भागासाठी पर्यवेक्षिका यांना सहाय्यक बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

हिंगोली जिल्ह्यात अक्षय तृतीया या दिवशी बालविवाह होऊ शकतात. यास प्रतिबंध म्हणून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात. त्यानुसार एखाद्या पुरुषाने अल्पवयीन बाल वधुशी विवाह केल्यास त्या पुरुषाला दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि एक लाख रुपयापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. जाणीवपूर्वक बालविवाह ठरविणाऱ्यास, त्यासाठीचा सोहळा पार पाडणाऱ्यास किंवा प्रोत्साहन देणाऱ्यास दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि एक लाख रुपयापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. बालविवाह झाल्यास संबंधित वर व वधु यांचे आई-वडील किंवा पालक, अन्य नातेवाईक मित्र परिवार, विवाह विधी पार पाडणारे संबंधित व्यक्ती, फोटोग्राफर, प्रिंटींग प्रेस, वाजंत्री, सभागृह व्यवस्थापक, कॅटरिंग अशा बालविवाह घडविण्यास मदत करणाऱ्या सर्वांना दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि एक लाख रुपयापर्यंत दंड होऊ शकतो. तसेच ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका यांनी जन्म दाखल्याची खोटी नोंद केल्यास त्यांच्यावरही कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिले आहेत.

# वसमत पंचायत समिती इमारतीचे भविष्य धोक्यात, निकृष्ट दर्जाच्या साहीत्याचा बांधकामात वापर?

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ८ मे**

येथे मागील काही दिवसापासून पंचायत समितीच्या नूतन इमारतीचे बांधकाम खाजगी कंत्राकदारामार्फत करण्यात येत आहे परंतु कंत्राटदार हे आर्थिक बचतीचे धोरण लक्षात ठेवून वाळू ऐवजी चक्क डस्टमध्ये मुख्य इमारतीचे बांधकाम पायापासूनच करत आहे. काम डस्टमध्ये करत असल्याने येणाऱ्या काळात इमारत कमकुवत होऊन धोकादायक ठरणार आहे. या सर्व प्रकाराकडे संबंधित विभागाचे अभियंता दुर्लक्ष करत असल्याने पहावयास मिळत आहे. त्यामुळे इमारतीचे भविष्य धोक्यात येणार आहे.

> शासकीय अभियंता वाळू बंद असल्याचे सांगून कंत्राटदाराची पाठराखण करत असल्याचे समोर दिसत आहे. वाळू, डस्ट, चुरी, आर्टिफिशियल वाळू यातील फरक अभियंत्यास कळत नसेल तर मुख्य इमारतीचे बांधकाम त्यांच्यामार्फत मजबूत होणे शक्यच नाही असे असताना आतापर्यंत झालेल्या कामाच्या चाचण्या तपासण्याचे रिपोर्ट तात्काळ मागून झालेल्या कामाची चौकशी लावण्यात यावी अशी मागणी होत आहे.

वसमत तालुक्याला विविध विकास कामांसाटी कोट्यावधीचा निधी मिळत आहे. पंचायत समिती इमारत बांधकामाबाबत संबंधित वृत्तपत्राच्या प्रतिनिधींनी या कामा संदर्भात अभियंताशी विचारणा केली असता वाळू बंद असल्याने कंत्राकदार हे आर्टिफिशियल वाळूत काम करत असल्याचे सांगून मोकळे झाले आहे परंतु मुख्य इमारतीच्या कामाच्या जागी पाहणी केली असता आर्टिफिशियल न वापरता चक्क डस्टमध्ये इमारतीचे मुख्य कॉलमव पायाभरणीचे काम सुरू आहे. परंतु आता या झालेल्या कामाच्या तपासण्या कुठल्या स्तरावर करतील व येणाऱ्या तपासण्या तसेच चाचणीचा रिपोर्ट तरजोड करून येते का हे पाहणे तितकेच गरजेचे आहे.



**हिंगोली- वसमत येथील पंचायत समितीचे बांधकाम कोट्यावधी रूपये खर्च करून करण्यात येत आहे परंतु या बांधकामासाठी कंत्राटदार निकृष्ट दर्जाच्या साहीत्याचा वापर करीत असल्यामुळे इमारतीचे भविष्य धोक्यात सापडणार आहे. वाळू ऐवजी चक्क डस्टचा वापर करतांना दिसत आहेत. याकडे वरिष्ठांनी लक्ष घालण्याची मागणी होत आहे.**

## संक्षिप्त वृत्त

### औंढा पोलिसांकडून नागरिकांना आवाहन

औंढानागनाथ- पोलीस स्टेशन औंढा ना हद्दीतील सर्व ग्रामस्थांना विनंती करण्यात येते की सध्या उन्हाळ्याचे दिवस चालू असून घराचे दरवाजे उघडे ठेवून घरातील लोक बाहेर झोपतात तसेच लग्नसराईचे दिवस असल्याने घराला कुलूप लावून लोक बाहेरगावी जात आहेत. या संधीचा फायदा घेऊन चोरटे घरातून मौल्यवान वस्तू चोरून नेऊ शकतात त्यामुळे घरात/कपाटात मौल्यवान वस्तू न ठेवता घरात न सापडणाऱ्या अडगळी च्या ठिकाणी ठेवावे किंवा बँक लॉकरमध्ये ठेवण्यात यावेत जेणेकरून आपले नुकसान होणार नाही.मागील काही दिवसापासून अशा घटना घडत आहेत. आपल्या गावामध्ये ग्राम सुरक्षा दल स्थापन करावे व रोज रात्री ११:०० ते ०५:०० वा पर्येत अळीपाळीने रात्रीला सतर्क राहावे जर कोणी संशयितरित्या फिरताना मिळून आल्यास तात्काळ पोलीस स्टेशन औंढा येथे ८६६९९००६८३ या नंबर वर संपर्क साधावा अथवा डायल ११२ या क्रमांकावर फोन करावा, असे आवाहन पोलिस निरीक्षक जी एस राहीरे यांनी केले आहे.

### हिंगोलीत भगवान परशुराम जयंतीनिमित्त शोभायात्रा



हिंगोली- भगवान परशुराम जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सकल ब्राम्हण समाजाच्यावतीने दि १६ मे रोजी शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे तसेच दि १० मे रोजी रेल्वे स्टेशन रोडवरील गायत्री भवनात सकाळी ११ वाजता सकल ब्राम्हण समाजाच्यावतीने भगवान श्री परशुराम जयंतीनिमित्त भगवान परशुरामांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येणार आहे. दि १६ मे रोजी भगवान परशुरामांची भव्य शोभायात्रा दत्त मंदिर मंगळवारा येथून सायंकाळी ४ वाजता निघणार आहे. शहरातील प्रमुख मार्गावरून शोभायात्रेचा गायत्री भवन येथे समारोप होणार असून याठिकाणी विधिवत पूजा, महाआरती तसेच महाप्रसादाचे आयोजनही करण्यात आले आहे. सदरील कार्यक्रमास मोठ्या संख्येने ब्राम्हण समाजाने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.



हिंगोली- येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानात बांधकाम करण्यात येणार असल्यामुळे हे मैदान आता खेळाडूंसाठी बंद करण्यात आले आहे. छाया- सुनील पाठक

# रस्त्याचे काम संथगतीने, फुटकळ व्यापाऱ्यांवर उपासमारीची वेळ

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, ८ मे**

येथे विकास योजनेअंतर्गत रेस्ट हाऊस ते नागनाथ मंदिरापर्यंतच्या रोडचे बांधकाम होत असून हे बांधकाम तहसील परिसरातही सुरू असल्याकारणाने तहसील परिसरातील असलेली सर्व दुकाने उठवण्यात आली असल्यामुळे त्या व्यवसायिकावर मात्र उपासमारीची वेळ आल्याचे दिसून येत आहे.

तहसील परिसरात पंचायत समिती, न्यायालय, भूमी अभिलेख कार्यालय रजिस्ट्री ऑफिस, मुख्य उद्यान असल्याकारणाने या परिसरात झेरॉक्स सेंटर, कॉम्प्युटर जॉबवर्क, टायपिंग सेंटर, नोटरी कार्यालय तसेच वकीलांचे पर्सनल कार्यालय, बौंड विक्रेत्यांचे दुकाने, छोटी मोठी हॉटेल आदी व्यवसाय चालू होते दरम्यान या रोडवर बांधकाम चालू केल्याने या सर्व दुकान धारकांच्या दुकानांना उठवण्यात आले. त्यामुळे सर्व कार्यालयात येणाऱ्या लोकांची मात्र झेरॉक्स काढणे, कम्प्युटर जॉबसाठी तारांबळ उडाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अनेक व्यवसायिक मात्र बेरोजगार झाल्याचे दिसून येत आहे सदर रोड हा कार्यालयाच्या परिसरात असल्याकारणाने या रोडवर सतत कर्मचारी वर्ग व उद्यानांकडे जाणारा मार्ग असल्यामुळे सामान्य जनतेला ये-जा करावी लागते त्यातच रोडचे बांधकाम चालू असल्यामुळे या रोडवर धूळ मातीने अक्षरशः जीव मेटाकुटीला येत आहे. संबंधीत गुत्तेदार मात्र या रस्त्याचे काम संथगतीने करीत असल्यामुळे सामान्य नागरिकांसह फुटकळ व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. पुढचा महिना हा विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा असल्याकारणाने तहसील परिसरात शैक्षणिक प्रमाणपत्र साठी आणखीनच वर्दळ वाढणार आहे.या परिसरात कुठलेही झेरॉक्स जॉबवर्क दुकाने नसल्याकारणाने सामान्य जनतेचे हाल होणार असे दिसून येत आहे त्यामुळे सदर रोडचे काम जलद गतीने व्हावे अशी मागणी या मार्गावर असलेले व्यवसायिक व सामान्य जनतेकडून होत आहे.

# चोंढी खुर्दमध्ये आकडे टाकून वीज वापरणाऱ्या ३२ जणांविरूध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ मे**

सेनगाव तालुक्यातीील चोंढी खुर्द आणि चोंढी बुद्रुक येथे वीज वाहीनीवर आकोडे टाकून अनधिकृतपणे वीज वापरणाऱ्या ३२ जणांवर सेनगाव पोलिस ठाण्यात बुधवार दि ८ मे रोजी वीज चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, सध्या वीज कंपनीकडून वीज देयकाची थकबाकी वसुली मोहीम सुरू आहे. या मोहीमेसोबतच ग्रामीण भागातील वीज वाहीनीवंर आकोडे टाकून वीज वापरणाऱ्यांची तपासणी देखील केली जात आहे. त्यानुसार वीज कंपनीचे सेनगाव उपविभागाचे अभियंता सत्यनारायण वडगावकर यांच्या पथकाने चोंढी बुद्रुक आणि चोंढी खुर्द येथे अचानक तपासणी मोहीम हाती घेतली. या तपासणीमध्ये धक्कादायक बाब पुढे आली आहे. गावातील एक दोन नव्हे तर तब्बल ३२ जणांनी वीज वाहीनीवर आकोडे टाकून अनधिकृतपणे वीजेचा वापर चालविल्याचे दिसून आले. याप्रकरणात अभियंता वडगावकर यांच्या पथकाने वीज वाहीनीवरील आकोडे टाकण्यासाठी वापरलेले केबल जप्त केले आहे. तसेच या गावकऱ्यांना दंडासह वीजेचे देयक भरण्याच्या सुचना दिल्या होत्या. मात्र त्यानंतरही या गावकऱ्यांनी त्याला प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अभियंता वडगावकर यांनी बुधवारी सेनगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

यावरून पोलिसांनी आत्माराम काळे, साहेबराव भालेराव, सुभाष काळे, दिलीप खिल्लारे, लक्ष्मण काळे, कैलास बनसोडे, मधुकर बनसोडे, ईश्वर बनसोडे, विजय काळे, संतोष वायचाळ, विठ्ठल शिंदे, रामेश्वर कंवर, रामेश्वर काळे, अमोल बनसोडे, सोनु गोडे, अविनाश साळवे, जनार्दन काळे, गजानन जाधव, संजय काळे, लक्ष्मण इंगोले, दामोदर झाडे, यशवंत मोरे, गंगाराम शिंदे, नामदेव काळे, लक्ष्मण निवृत्ती काळे, लक्ष्मण अंभोरे, नारायण तांबोळी सर्व रा चोंढी खुर्द तसेच गौतम भालेराव, बंडू खिल्लारे, त्र्यंबक काळे रा. चोंढी बुद्रुक यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

# फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या अधिकाऱ्यानेच केला १३ लाखांचा अपहार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ मे**

सेनगाव येथील एका फार्मर प्रोड्युसर कंपनीमध्ये सीईओ पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्याने १३ लाखांचा अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. त्याने ११ शेतकऱ्यांचा २३२ क्विंटल हरभरा परस्पर विक्री केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्याच्याविरूध्द मंगळवार दि ७ मे रोजी रात्री उशिरा सेनगाव पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, सेनगाव येथे शेतकऱ्यांचा शेतीमाल खरेदी-विक्री करण्यासाठी स्मृती महिला फार्मर प्रोड्युसर कंपनी स्थापन करण्यात आली आहे. या कंपनीकडून शेतकऱ्यांचा शेतीमाल खरेदी करून त्यांना योग्य भाव दिला जातो. याठिकाणी खरेदी केलेला शेतीमाल नाफेडकडे दिल्यानंतर त्यातून कंपनीला कमीशन मिळते शिवाय शेतीमालासही चांगला भाव मिळतो. त्यामुळे हरभरा उत्पादक शेतकऱ्यांनी याठिकाणी हरभरा विक्री केला होता.

दरम्यान, या कंपनीचे सीईओ म्हणून कार्यरत असलेला सुरज प्रताप मोरे रा वरूड चक्रपान याने दि १६ मे २०२३ ते दि ११ सप्टेंबर २०२३ या कालावधीत या खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांचा हरभरा खरेदी केला. मात्र सदर खरेदी केलेला हरभरा नाफेडकडे पोहोचविण्याऐवजी त्याची परस्पर विक्री केली. यामध्ये ११ शेतकऱ्यांचा २३२ क्विंटल हरभरा पिकाचा समावेश आहे. त्यातून आलेल्या १३ लाख रूपयांचा अपहार केला. दरम्यान, याठिकाणी विक्री केलेल्या हरभरा पिकाचे पैसे अद्याप बँक खात्यात जमा का झाले नाही अशी विचारणा करण्यासाठी शेतकरी कंपनीच्या खरेदी केंद्रावर आले होते. मात्र सुरूवातीला सुरज याने त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर शेतकऱ्यांनी नाफेडकडे हरभरा विक्रीच्या पैशाची चौकशी केली असता नाफेडकडे हरभरा आलाच नाही असे सांगण्यात आले. यावरून सुरज याने कंपनी आणि शेतकऱ्यांची फसवणुक केल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी कंपनीचे कर्मचारी शेकुराव हागवणे यांनी तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# घरकुल लाभार्थ्यांना गोळेगाव वाळू डेपोतून वाळू पुरवठा करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ मे**

तालुक्यामध्ये ग्रामीण भागामध्ये घरकुल योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात घरकुल बांधकामाचे कामे चालू आहेत. घरकुल लाभार्थ्यांना वाळू मिळत नसल्याने घरकुलाची कामे रखडली आहेत. घरकुल बांधकामसाठी वाळू उपलब्ध करून द्या अशी मागणी रिपब्लिकन सेनेने तहसीलदारांकडे केली आहे.

तालुक्यामध्ये व संपूर्ण ग्रामीण भागामध्ये रमाई आवास योजना व शबरीची घरकुलाची कामे चालू आहेत. परंतु त्या कामांना वाळू मिळत नसल्यामुळे अपुरे आहेत. पंचायत समिती विभागाकडून वारंवार लाभधारकांना सांगण्यात येत आहे की लवकर घरकुल पूर्ण करावे. परंतु वाळू नसल्याकारणाने अनेक लाभार्थी हतबल आहेत. अनेक ठिकाणी वाळूचे लिलाव बंद असल्यामुळे अवैध मार्गाने वाळू एक ट्रॅक्टर पाच ते सहा हजाराला मिळत आहे. सामान्य माणसाच्या खिशाला न परवडणारा हा खर्च आहे. त्यामुळे गोळेगाव येथील वाळू डेपोवर तहसील प्रशासनाने वाळूचा खूप मोठा स्टॉक केला आहे. परंतु हा स्टाक घरकुल धारकांसाठी आहे की वाळू माफियासाठी आहे.

मागच्या वर्षी वाळू माफियानी बोगस आधार कार्ड नोंदणी करून पुर्ण वाळु डेपो लुटण्याचा प्रकार घडला होता. लाभार्थी यांना एक ब्रास रेतीचा लाभ मिळाला नाही आता प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून गरिबांना घरकुलासाठी वितरीत करण्यासाठी प्रयत्न करावेत. तालुका प्रशासनाने याविषयी योग्य पाऊल उचलावे लाभार्थ्यांना ग्रामपंचायत मार्फत किंवा तलाठ्या मार्फत या वाळूचे वाटप करावे अन्यथा रिपब्लिकन सेनेच्यावतीने गोळेगाव वाळु डेपोवर आंदोलन करून थेट वाळु घरकुल लाभार्थ्यांना देण्याचा इशारा निवेदनातुन दिला आहे. या निवेदनावर रिपब्लिकन सेना युवा प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे, कपिल साखरे, नितीन गव्हाणे, विनोद जोगदंड, मनोज मुळे, राहुल पुंडगे यांच्या निवेदनात स्वाक्षऱ्या आहेत. दरम्यान शासनाने केवळ वाळू डेपो उभारण्याचा सोपस्कार केला आहे. याचा लाभ सर्वसामान्यांना मिळत नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.